
रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २८७
www.ramprahar.com
◆ बुधवार, ६ मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

संकटात धावला मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष/२
कशेळे गावच्या हद्दीत आढळला मृतदेह/५
ज्युनियर महाराष्ट्र, महाराष्ट्र श्री स्पर्धा उत्साहात/८

## ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा; ३६५ रुपये एफआरपी



**नवी दिल्ली** : ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून केंद्र सरकारने साखर हंगाम २०२६-२७साठी उसाची वाजवी आणि किफायतशीर किंमत (एफआरपी) ३६५ रुपये प्रति क्विंटल निश्चित केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि. ५) झालेल्या आर्थिक व्यवहारविषयक मंत्रिमंडळ समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. नवीन दर १०.२५ टक्के साखर उताऱ्यावर आधारित असून त्यापेक्षा प्रत्येक ०.१ टक्के वाढीसाठी ३.५६ रुपये प्रति क्विंटल प्रोत्साहन दिले जाणार आहे तसेच उताऱ्यात घट झाल्यास तितक्याच दराने कपात होईल, मात्र ९.५ टक्क्यांपेक्षा कमी उतारा असलेल्या साखर कारखान्यांसाठी कोणतीही कपात न करण्याचा निर्णय घेण्यात आला असून अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना किमान ३३८.३० रुपये प्रति क्विंटल दर मिळणार आहे.

# लैंगिक अत्याचारातील आरोपींना पॅरोल नको!

## मुख्यमंत्र्यांचे निर्देश; राज्यात नवा कडक कायदा येणार

**मुंबई : प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथील चिमुकलीवर झालेल्या अमानवीय अत्याचार आणि हत्या प्रकरणात पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी आणि अशा गुन्हेगारांवर लगाम घालण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला आहे. लैंगिक शोषणातील आरोपींना पॅरोल न देण्याबाबत नवीन कायदा करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी मंगळवारी (दि. ५) विधी व न्याय विभागाला दिले.

मंत्रिमंडळ बैठकीत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांतील ८० ते ९० टक्के आरोपी हे आधी त्याच गुन्ह्याखाली जेलमध्ये असतात आणि पॅरोलवर बाहेर आल्यावर ते पुन्हा तशाच प्रकारचे कृत्य करतात. या गुन्हेगारांची ही साखळी तोडण्यासाठी २०१४ ते २०१९ या काळात राज्य सरकारने लैंगिक अत्याचारातील गुन्ह्यातील आरोपींना पॅरोल मिळू नये असा कायदा केला होता. हा कायदा दोन ते तीन वर्षे अस्तित्वात होता, पण



कालांतराने तो न्यायालयाने रद्दबातल ठरवला. आता पुन्हा प्रभावी कायदा तयार करा, जेणेकरून नराधमांना कायद्याची कोणतीही पळवाट मिळणार नाही.

नसरापूर घटनेतील संतापावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस भावूक झाले. "एका बापाच्या नात्याने आणि राज्याचा मुख्यमंत्री म्हणून मलाही वाटते की अशा नराधमाला भरचौकात फाशी द्यावी, पण लोकशाहीत आपल्याला कायद्याच्या चौकटीत राहूनच कारवाई करावी लागते," अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. पीडितेच्या वडिलांशी स्वतः दोनदा संवाद साधल्याचे सांगत त्यांनी खात्री दिली की, या नराधमाला मृत्युदंडाचीच शिक्षा व्हावी यासाठी सरकार पूर्ण ताकद लावेल.

या प्रकरणातील तपासाबाबत मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, उच्च न्यायालयाच्या माध्यमातून हा खटला फास्ट ट्रॅकवर नेला जाईल तसेच वेळेत चार्जशीट दाखल करून आरोपीला कोणतीही संधी दिली जाणार नाही. यासोबत कायद्याचा कोणताही दुरूपयोग होऊ नये यासाठी विशेष खबरदारी घेतली जाणार आहे.

## राज्यातील आदिवासींच्या २४ आश्रमशाळांची श्रेणीवाढ

**मुंबई : प्रतिनिधी**



आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून स्वयंसेवी संस्थांकडून चालविण्यात येणाऱ्या पाच प्राथमिक आश्रमशाळांची माध्यमिक स्तरापर्यंत आणि १९ माध्यमिक शाळांची उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालय स्तरापर्यंत श्रेणीवाढ करण्यास मंगळवारी (दि. ५) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे राज्यातील डोंगराळ, दुर्गम भागातील आदिवासी बांधवांच्या मुलांचे शिक्षण गतिमान होणार आहे.

राज्यातील डोंगराळ व दुर्गम भागातील आदिवासींमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी सन १९७२-७३पासून आश्रमशाळा समूह योजना सुरू आहे. या योजनेंतर्गत सध्या स्वयंसेवी संस्थाकडून ५५६ अनुदानित आश्रमशाळा चालवल्या जातात. त्यापैकी ३७ प्राथमिक अनुदानित आश्रमशाळा (इयत्ता पहिली ते सातवी) व ३१९ माध्यमिक अनुदानित आश्रमशाळा (इयत्ता पहिली ते दहावी) आहेत तसेच माध्यमिक आश्रमशाळा संलग्न २०० कनिष्ठ महाविद्यालये (इयत्ता पहिली ते बारावी) सुरू आहेत. या शाळांमध्ये सुमारे दोन लाख ६१ हजार ८३६ (एक लाख ४० हजार २५४ मुले आणि एक लाख २१ हजार ५८२ मुली) विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या आश्रमशाळा दुर्गम, अतिदुर्गम, डोंगराळ किंवा नक्षलग्रस्त अशा भागात आहेत. घरच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे आदिवासी विद्यार्थी तालुका किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन पुढील शिक्षण घेण्यास उत्सुक नसतात. त्यामुळे गळतीच्या प्रमाणात वाढ होऊन विद्यार्थी माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक शिक्षणापासून वंचित राहतात. त्यामध्ये विशेषतः मुलींची संख्या मोठी असते. यासाठी या विद्यार्थ्यांना त्यांच्या परिसरातच निवासी शिक्षण उपलब्ध करून देण्यावर भर आहे.

याशिवाय राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगानेही आदिवासी विकास विभागाला अनुदानित आश्रमशाळांना प्रोत्साहन देण्याची शिफारस केली आहे. यानुसार राज्यातील पाच प्राथमिक आश्रमशाळांची श्रेणीवाढ करून तिथे आठवी ते दहावीचे वर्ग सुरू करण्यास तसेच माध्यमिक अनुदानित आदिवासी आश्रमशाळांमध्ये १८ ठिकाणी कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय (इयत्ता अकरावी व बारावी कला व विज्ञान शाखा) व एका ठिकाणी केवळ अकरावी व बारावी कला अशा १९ अनुदानित माध्यमिक आश्रमशाळा संलग्न कनिष्ठ महाविद्यालये सुरू करण्यास मान्यता देण्यात आली.

## पालघरमध्ये भोंदूबाबाकडून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

### आरोपीला अटक

**डहाणू : प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यातील कासा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची घटना समोर आली आहे. गावठी औषध देण्याच्या आणि अघोरी उपायांच्या बहाण्याने एका ५५ वर्षीय भोंदूबाबाने अल्पवयीन मुलीला जंगलात नेऊन अत्याचार केले. आरोपी शिवराम परश सावर याला पोलिसांनी अटक केली आहे.

पीडितेच्या बहिणीला आजारपणामुळे गावठी औषध हवे असल्याने ३० एप्रिल रोजी नातेवाइकांनी औषध देणाऱ्या भोंदूबाबाला संपर्क केला होता. औषध देण्याच्या बहाण्याने ४ मे रोजी रात्री १च्या सुमारास आरोपीने पीडितेला चरी पावण येथील जंगलातील निर्मनुष्य ठिकाणी नेऊन तिच्यावर अत्याचार केले आणि याविषयी कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली होती.

पोलिसांनी तातडीने कारवाई करीत आरोपी शिवराम सावर याला राहत्या घरून अटक केली. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.



**खारघर : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाला गुणवत्ता व्यवस्थापन प्रणालीसाठी आयएसओ प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले. यावेळी व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, सदस्य ॲड. राहुल घरत, प्राचार्य निशा नायर आदी उपस्थित होते.**

## निवडक

### चंदिगड येथे लँडिंगदरम्यान विमानात स्फोट; पाच जखमी

**चंदिगड** : गोवा आणि हैदराबादमार्गे चंदिगडला येणाऱ्या इंडिगोच्या विमानात लँडिंगच्या वेळी मोबाइल पॉवर बँकचा स्फोट झाल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (दि. ५) घडली. मोहाली येथील शहीद भगतसिंग आंतरराष्ट्रीय विमानतळावर विमान उतरत असतानाच ही दुर्घटना घडली असून यामध्ये पाच प्रवासी जखमी झाले आहेत. या घटनेमुळे विमानात काही काळ प्रचंड गोंधळ आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

### मनोज तिवारींचा 'तृणमूल'ला राम राम! ममतांवर गंभीर आरोप

**कोलकाता** : भारताचा माजी क्रिकेटपटू आणि तृणमूल काँग्रेसचे नेते मनोज तिवारी यांनी मंगळवारी (दि. ५) पक्षाला राम राम ठोकला. प. बंगाल विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर त्यांनी गंभीर आरोप करीत तिकिटासाठी मोठ्या रकमेची मागणी होत असल्याचा दावाही केला आहे. दुसरीकडे पराभवानंतर सैरभैर झालेल्या ममता बॅनर्जी यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणार नसल्याचे म्हटले आहे.

## थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त उद्या विविध समाजोपयोगी उपक्रम



### स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार, लोकप्रतिनिधी सत्कार, गुणीजनांचा सन्मान आणि सांस्कृतिक कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कष्टकऱ्यांचे द्रष्टे नेते, थोर समाजसुधारक स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३८व्या पुण्यतिथीनिमित्त गुरुवारी (दि.७) सायंकाळी ६ वा. उलवे नोडमध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने विविध समाजोपयोगी कार्यक्रम होणार आहेत.

उलवे नोड सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर मैदानावर होणाऱ्या या समारंभात विशेषत्वाने पनवेल तालुकास्तरीय स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२६चे बक्षीस वितरण तसेच पनवेल-उरण तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचा सत्कार, शैक्षणिक, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या गुणीजनांचा सन्मान समारंभ आणि 'द फोक मराठी' हा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या समारंभाला प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, महापौर नितीन पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, उपमहापौर प्रमिला पाटील, पनवेल पं.स.च्या सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, संस्थेचे कार्यकारी मंडळ सदस्य अनिल भगत, प्रकाश भगत, संजय भगत, वसंत पाटील आदी मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

यावेळी नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव व नगरसेवक परेश ठाकूर, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी केले आहे.

### आज आढावा बैठक

थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांच्या ३८व्या पुण्यतिथीनिमित्त उलवे नोडमध्ये होणाऱ्या कार्यक्रमाची नियोजन आढावा बैठक बुधवारी (दि. ६) आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक सायंकाळी ५.३० वाजता उलवे नोड सेक्टर १२मधील रामशेठ ठाकूर मैदान येथे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

## महालक्ष्मी सरस प्रदर्शनात रायगडच्या २८ बचत गटांचा सहभाग

**अलिबाग : प्रतिनिधी**

मुंबईतील बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स संकुलातील एमएमआरडीए मैदानावर २ ते १४ मेदरम्यान महालक्ष्मी सरस प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनात रायगड जिल्ह्यातील एकूण २८ महिला बचत गटांनी सहभाग घेतला आहे. यामुळे रायगडच्या ग्रामीण भागातील महिलांना आपले उत्पादन विक्रीसाठी एक मोठे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानामार्फत महिला स्वयंसहाय्यता समूहांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना खुली बाजारपेठ मिळवून देण्याच्या उद्देशाने बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स संकुलातील एमएमआरडीए मैदानावर महालक्ष्मी सरस प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना त्यांनी जागतिक दर्जाच्या प्रदर्शनाशी महालक्ष्मी सरस प्रदर्शनाची तुलना होऊ शकते अशा प्रकारचे स्वरूप या प्रदर्शनाला देण्यात आले असल्याचे सांगितले.

या प्रदर्शनात रायगड जिल्ह्यातील २८ समूहांनी सहभाग घेतला असून जिल्हा महिला समन्वयक म्हणून निशा आवस्कर व जिल्हा समन्वयक सौरभ देशपांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या २८ बचत गटांपैकी २४ बचत गटांनी आपल्या विविध वस्तू विक्रीसाठी ठेवल्या आहेत, तर चार बचत गटांनी खाद्यपदार्थांचे स्टॉल लावले आहेत. या बचत गटांनी तयार केलेल्या विविध वस्तू, खाद्यपदार्थांना नागरिकांचा भरघोस प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे बचत गटांना आर्थिक सहाय्य मिळत आहे.

महालक्ष्मी सरस या विक्री प्रदर्शनास ग्राहकांनी भेट द्यावी, असे आवाहन रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे यांनी केले आहे.

सस्नेह निमंत्रण

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल आणि
श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित



स्व. जनार्दन भगत साहेब
यांची ३८वी पुण्यतिथी कार्यक्रम
निमित्ताने शिक्षण, क्रिडा व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या संस्था व व्यक्तींचा पारितोषिक वितरण समारंभ
तसेच पनवेल तालुकास्तरीय
"स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२६"
गुरूवार, दिनांक ७ मे २०२६ रोजी सायंकाळी ठिक ०६.०० वाजता
ठिकाण : रामशेठ ठाकूर मैदान, प्लॉट नं. ६, सेक्टर १२, उलवे नोड

स.न.वि.वि
आपणांस कळविण्यात येते की, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल आणि रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवार, दिनांक ७ मे २०२६ रोजी सायंकाळी ठीक ०६.०० वाजता "स्व. जनार्दन आत्माराम भगत साहेब" यांची ३८ वी पुण्यतिथी कार्यक्रम रामशेठ ठाकूर मैदान, प्लॉट नं.६, सेक्टर १२, उलवे नोड, नवी मुंबई येथे आयोजित केला असून सदर कार्यक्रमासाठी खालील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

समारंभ अध्यक्ष
मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब
माजी खासदार व चेअरमन ज.भ.शि.प्र.संस्था, पनवेल

प्रमुख पाहुणे
मा. श्री. प्रशांत ठाकूर — आमदार – पनवेल विधानसभा तथा अध्यक्ष, रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल
मा. श्री. महेश बालदी — आमदार – उरण विधानसभा
मा. श्री. नितीन पाटील — महापौर, पनवेल महानगरपालिका
मा. श्री. मंगेश वाकडीकर — अध्यक्ष, रायगड जिल्हा परिषद
मा. श्री. जे. एम. म्हात्रे — माजी नगराध्यक्ष, पनवेल
मा. श्री. अविनाश कोळी — अध्यक्ष, उत्तर रायगड जिल्हा भाजपा
मा. श्री. महेंद्र घरत — अध्यक्ष, रायगड जिल्हा काँग्रेस कमिटी
मा. श्री. अरूणशेठ भगत — अध्यक्ष, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल तथा अध्यक्ष, पनवेल तालुका भारतीय जनता पार्टी
मा. श्री. वाय. टी. देशमुख — उप कार्याध्यक्ष, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल
मा. सौ. प्रमिला पाटील — उपमहापौर, पनवेल महानगरपालिका
मा. सौ. रंजना वासकर — सभापती, पंचायत समिती पनवेल
मा. श्री. भुपेंद्र पाटील — उपसभापती, पंचायत समिती पनवेल
मा. श्री. अनिल पांडूरंग भगत — कार्यकारी मंडळ सदस्य, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल
मा. श्री. प्रकाश जनार्दन भगत — कार्यकारी मंडळ सदस्य, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल
मा. श्री. संजय जनार्दन भगत — कार्यकारी मंडळ सदस्य, ज.भ.शि.प्र.संस्था, पनवेल संचालक, रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ,पनवेल
मा. श्री. वसंत हरी पाटील — सभासद, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल

रायगड आणि नवी मुंबईमधील तमाम बंधू-भगिनींचे प्रेरणास्त्रोत असणाऱ्या स्वर्गीय जनार्दन आत्मराम भगत साहेबांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यासाठी हे आग्रहाचे निमंत्रण


आपले स्नेहांकित
श्री. परेश ठाकूर — सचिव, श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल कार्यकारी मंडळ सदस्य, ज.भ.शि.प्र.संस्था, पनवेल, मा. गटनेते, पनवेल महानगरपालिका, पनवेल
प्राचार्य डॉ. सिध्देश्वर तुकाराम गडदे — सचिव, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल

सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल आणि सर्व कर्मचारी वृंद श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल

# ‘एआय आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा स्वीकारणे ही काळाची गरज’

**मुंबई : प्रतिनिधी**

तंत्रज्ञानाच्या वेगाने बदलणाऱ्या युगात एआय आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा स्वीकारणे अत्यावश्यक आहे. हे केवळ तंत्रज्ञान क्षेत्रापुरते मर्यादित नसून सर्व क्षेत्रांमध्ये लागू आहे, ते स्वीकारले नाही तर आपण मागे पडू, असे स्पष्ट मत एनपीसीआयचे मुख्य रिलेशनशिप मॅनेजमेंट-भागीदारी नलिन बन्सल यांनी व्यक्त केले. मंत्रालयात आयोजित ‘टेक-वारी २.०’ अंतर्गत डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा : पेमेंट्स आणि सेवा या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून ते मार्गदर्शन करत होते.




लेखा व कोषागार विभागाच्या प्रधान सचिव रिचा बागला यांनी या सत्राचे प्रास्ताविक केले. डिजिटल पेमेंट्स प्रणालीमुळे व्यवहार अधिक पारदर्शक, जलद आणि उत्तरदायी झाल्याचे त्यांनी प्रास्ताविकात सांगितले. यावेळी प्रमुख वक्ता म्हणून बोलताना नलिन बन्सल म्हणाले की, भारतातील डिजिटल पेमेंट्स आणि वित्तीय प्रणाली ही एका दिवसात तयार झालेली नसून, गेल्या अनेक दशकांतील सातत्यपूर्ण धोरणे, नवकल्पना आणि समन्वयाचा परिणाम आहे. बँकिंग क्षेत्रातील बदल, मोबाईल क्रांती, आधारसारखी ओळख प्रणाली आणि डिजिटल नवकल्पना यामुळे आजची सक्षम डिजिटल अर्थव्यवस्था उभी राहिली आहे. यूपीआयसारख्या प्रणालींमुळे देशात मोठ्या प्रमाणावर आर्थिक समावेशन साध्य झाले आहे. आज लाखो नागरिक आणि लघुउद्योग डिजिटल व्यवहार करत असून, व्यवहारांची कार्यक्षमता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. केवायसीसारख्या प्रक्रियांचा खर्च लक्षणीयरित्या कमी झाला असून कर्ज वितरण, विमा आणि गुंतवणूक सेवांमध्येही सुलभता आली आहे. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचे वैशिष्ट्य म्हणजे या प्रणाली एका सक्षम आणि विश्वासार्ह संस्थेच्या चौकटीत चालतात. शासन, बँका, तंत्रज्ञान संस्था आणि नियामक यांचा समन्वय असल्याशिवाय या प्रणाली यशस्वी होत नाहीत, असे त्यांनी नमूद केले.

बन्सल यांनी जलद आणि पारदर्शक व्यवहाराची विविध उदाहरणे देताना सांगितले की, थेट लाभ हस्तांतरण, आधार-आधारित पेमेंट्स, यूपीआय, ई-मँडेट यासारख्या प्रणालींमुळे नागरिकांना जलद सेवा मिळत आहे. भविष्यात यूपीआयद्वारे कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू असून, त्यामुळे लहान व्यवहारांसाठी त्वरित कर्ज मिळू शकणार आहे. ते म्हणाले की, देशात अजूनही मोठा वर्ग डिजिटल प्रणालीपासून दूर आहे. या वर्गाला तंत्रज्ञान समजावून सांगणे, विश्वास निर्माण करणे आणि त्यांच्यापर्यंत सेवा पोहोचवणे ही पुढील मोठी जबाबदारी आहे. समावेशन आणि कार्यक्षमता हीच डिजिटल पायाभूत सुविधांची खरी ताकद आहे,एआयच्या संदर्भात बोलताना त्यांनी सांगितले की, डेटा विश्लेषण, फसवणूक ओळख, ग्राहक सेवा आणि निर्णय प्रक्रिया या क्षेत्रांमध्ये एआयचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होणार आहे. तसेच ब्लॉकचेनसारख्या तंत्रज्ञानामुळे व्यवहारांसोबत मालकी हक्कही एकाच प्रणालीत हस्तांतरित होऊ शकतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

# संकटात धावला मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष!

## कर्करोगाच्या उपचारासाठी भरीव मदत

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**




रायगड जिल्ह्यातील महाड येथील ४२ वर्षीय मयूर चांदुरकर यांना कर्करोगाचे निदान झाले. उपचार खर्चाचा प्रश्न निर्माण झाला होता. बेताची आर्थिक परिस्थिती असल्याने कुटुंबीयांपुढे मोठे संकट उभे राहिले. अशावेळी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून वेळेत आर्थिक मदत मिळाल्याने त्यांच्यावर आवश्यक उपचार करणे शक्य झाले.

मयूर चांदुरकर यांना मागील ९ ते १० वर्षांपासून किडनी संबंधित आजाराचा त्रास होता. अचानक त्यांचे वजन कमी होऊ लागले आणि अशक्तपणा वाढू लागला. प्रकृती खालावत असल्याने त्यांनी रुग्णालयात धाव घेतली. तपासणीत हिमोग्लोबिन अत्यंत कमी असल्याचे निष्पन्न झाले. रक्त चढवूनही हिमोग्लोबिन स्थिर राहत नसल्याने डॉक्टरांनी पुढील तपासण्या केल्या. त्यातून चांदुरकर यांना रक्ताचा कर्करोग झाल्याचे निष्पन्न झाले.

रायगड जिल्ह्यातील महाड येथील मयूर चांदुरकर हे किरकोळ व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांच्या घरी वृद्ध आई-वडील, आजी, पत्नी आणि दोन अपत्ये अशी मोठी जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आहे. अशा परिस्थितीत कर्करोगाच्या उपचारासाठी लागणारा सुमारे १५ ते १८ लाख रुपयांचा खर्च उचलणे त्यांच्यासाठी कठीण होते.

सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीबाबत माहिती मिळाली. त्यानंतर त्यांनी बॉम्बे हॉस्पिटलच्या माध्यमातून मदतीसाठी कक्षाकडे अर्ज केला. आपल्या बिकट आर्थिक परिस्थितीची व कौटुंबिक जबाबदाऱ्यांची माहिती त्यांनी मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांच्यापर्यंत पोहोचवली.

या प्रकरणाची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार चांदुरकर यांना मुख्यमंत्री सहायता निधीतून तात्काळ २ लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली. तसेच, मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाच्या समन्वयातून टाटा ट्रस्टकडून १० लाख रुपयांची आर्थिक मदतही मिळाली. या सहाय्यामुळे त्यांच्यावर आवश्यक उपचार वेळेत सुरू करणे शक्य झाले.

उपचारानंतर १६ एप्रिल २०२६ रोजी त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला असून, सध्या त्यांच्या प्रकृतीत समाधानकारक सुधारणा होत आहे. उपचारानंतर त्यांनी कर्करोगावर यशस्वीपणे मात केली असून ते आता सुखरूप घरी परतले आहेत. या कठीण काळात मिळालेल्या मदतीबद्दल चांदुरकर व त्यांच्या कुटुंबीयांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे आभार मानले आहेत.

राज्यातील कोणताही रुग्ण उपचाराअभावी वंचित राहू नये, यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्ष सातत्याने कार्यरत आहे. मयूर चांदुरकर यांच्यासारख्या अनेक गरजू रुग्णांना या माध्यमातून मदत मिळत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली ही योजना प्रभावीपणे राबवली जात असून, गरजू रुग्णांनी मदतीसाठी १८०० १२३ २२११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी कळविले आहे.

# मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते करलासमध्ये महिला कुणबी समाज सभागृहाचे लोकार्पण

## स्मशानभूमी रस्ता व सभागृहासाठी ११ लाखांचा निधी

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

राज्याच्या महिला व बालविकास मंत्री कु. आदिती वरदा सुनील तटकरे यांनी श्रीवर्धन तालुक्यातील विविध ग्रामीण भागांचा दौरा केला. या दौऱ्यात करलास गावातील ग्रामस्थांच्या अनेक वर्षांच्या मागणीला यश आले असून, मंत्री महोदयांच्या हस्ते नूतन 'महिला कुणबी समाज व्यावसायिक सभागृहा'चे उद्‌घाटन आणि स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याचे भूमिपूजन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.



मंत्री आदिती तटकरे यांचे करलास गावात आगमन होताच ग्रामस्थांनी आणि कुणबी समाज बांधवांनी लेझीम, ढोल-ताशा आणि सनई-चौघड्यांच्या निनादात त्यांचे जंगी स्वागत केले. यावेळी महिलांनी मोठी गर्दी केली होती. "आदिती ताई आगे बढो, हम तुम्हारे साथ है" अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना आदिती तटकरे म्हणाल्या की, "एखादे काम मंजूर होणे ही पहिली पायरी असते, पण ते काम लोकांच्या अपेक्षेनुसार आणि वेळेत पूर्ण होणे हे लोकप्रतिनिधी म्हणून आमचे कर्तव्य आहे. आज करलास गावातील महिला आणि ग्रामस्थांचे हे अफाट प्रेम पाहून आपण काहीतरी चांगले काम करतोय याची पोचपावतीच मला मिळाली आहे. महिला सभागृहामुळे गावातील भगिनींना रोजगाराच्या व प्रशिक्षणाच्या नवीन संधी उपलब्ध होतील."

गावातील विकासकामांसाठी मंत्री महोदयांनी एकूण ११ लाख रुपयांचा निधी दिला आहे. यात स्मशानभूमी रस्त्यासाठी ६ लाख आणि महिला कुणबी समाज व्यावसायिक सभागृहासाठी ५ लाख रुपयांचा समावेश आहे.या कार्यक्रमाला तालुकाध्यक्ष मंदार तोडणकर, सभापती सुचिन किर, पंचायत समिती सदस्य सौ. वासंती गुणाजी तसेच करलास गावातील स्थानिक पदाधिकारी, आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# खोपोलीत घरफोडीचे सत्र; बंद फ्लॅटवर चोरट्यांची नजर

**खोपोली : प्रतिनिधी**

फ्लॅट मालक लग्न कार्यासाठी मूळ गावी गेल्याची संधी साधून चोरट्यांनी ३लाख ६० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने तसेच रोख रक्कम चोरुन नेल्याची घटना खोपोली शहरात घडली. आठवड्यात घरफोडीची दुसरी घटना आहे.

यशोदास सृष्टी ,काटरंग खोपोली येथे राहणारे कुटुंब २ मे ते ४मे दरम्यान त्यांचे मुळगावी आडोशी साजगाव येथे लग्न कार्यासाठी गेलेले असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने फ़्लॅटच्या दरवाजाचे लॉक तोडुन फ़्लॅटमध्ये प्रवेश केला. बेडरुममधील कपाटाचा दरवाजा तोडून सोन्याचे दागिने तसेच रोख रक्कम चोरुन नेले. लग्न कार्य आटोपून घरी आल्यावर चोरीचा प्रकार उघडकीस आला.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक विजय जगताप हे करीत आहेत.

# अपर्णा गिते यांना पोलीस महासंचालक पदक

**मुंबई : प्रतिनिधी**

महावितरणच्या कार्यकारी संचालक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्रीमती अपर्णा गिते यांना त्यांच्या उत्कृष्ट सेवेबद्दल मानाच्या पोलीस महासंचालक पदकाने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या यशामुळे महावितरणसह पोलीस दलाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



श्रीमती अपर्णा गिते यांनी आपल्या पोलीस कारकिर्दीत अत्यंत कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आणि शिस्तबद्ध अधिकारी म्हणून ओळख निर्माण केली आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासोबतच सार्वजनिक हितासाठी त्यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाची दखल घेऊन त्यांना या पदकाने गौरवण्यात आले आहे.

महावितरणमध्ये कार्यकारी संचालक (सुरक्षा व अंमलबजावणी) या पदाची जबाबदारी स्वीकारल्यापासून त्यांनी वीज चोरी रोखणे, अंमलबजावणी व सुरक्षा यंत्रणेत समन्वय साधणे आणि विभागात शिस्तबद्ध कार्यक्षमता आणण्यासाठी प्रभावी पावले उचलली आहेत. महत्त्वाच्या मोहिमा यशस्वीपणे राबवल्या.

# नमुंमपा आरोग्यसेवेचा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी घेतला सविस्तर आढावा

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या वतीने पुरविल्या जात असलेल्या आरोग्य सेवांच्या गुणवत्ता वाढीसाठी नियोजनबध्द पावले उचलण्याच्या दृष्टीने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी आरोग्य विभागातील प्रमुख वैदयकीय अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेत प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रापासून सार्वजनिक रुग्णालयापर्यंत सर्व ठिकाणी दिल्या जाणाऱ्या सेवांचे मुख्यालय पातळीवर नियमितपणे मूल्यमापन करावे व त्यात सुधारणा करावी असे निर्देश दिले.

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, वैदयकीय आरोग्य अधिकारी डॉ.राजेश म्हात्रे आणि तिन्ही सार्वजनिक रुग्णालयांचे वैदयकीय अधिक्षक, माता बाल रुग्णालयांचे वैदयकीय अधिकारी व आरोग्य विषयक कार्यक्रमांचे वैदयकीय अधिकारी तसेच नमुंमपा पीजी मेडिकल संस्थेचे डीन डॉ. ज्ञानेश बेलेकर उपस्थित होते.



महानगरपालिकेच्या वतीने क्षेत्रीय स्तरावर २६ प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून वैदयकीय तपासणी व उपचार केले जातात. येथून संकलित होणारी नागरिकांच्या आरोग्य स्थितीची माहिती अचूक व अद्ययावत असावी याकडे कटाक्षाने लक्ष देण्याचे निर्देश देतानाच या माहितीची मुख्यालय स्तरावरुन आढावा घेऊन पडताळणी करण्यात यावी असे निर्देशित करण्यात आले. अशाच प्रकारे माता बाल रूग्णालये व सार्वजनिक रूग्णालये येथील रूग्ण व उपचारांचाही नियमित आढावा घेण्यात यावा अशा सूचना देण्यात आल्या.

महानगरपालिकेमार्फत नियमितपणे सुरु असणारे लसीकरण कार्यक्रम, तपासणी मोहीमा, आरोग्य शिबीरे याचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा यादृष्टीने अधिक प्रभावी कामगिरी व्हायला हवी असे सूचित करतानाच यामध्ये स्थानिक नगरसेवकांचा सक्रिय सहभाग घ्यावा जेणेकरुन जास्तीत जास्त नागरिक यामध्ये सहभागी होतील असे आयुक्तांनी सूचित केले.

महानगरपालिका क्षेत्रातील मागील तीन वर्षांतील जन्मदर व मृत्यूदराचा वर्षनिहाय आढावा घेताना आयुक्तांनी प्रत्येक मृत्यूची कारणमीमांसा करुन डेथ ऑडिट करावे आणि मृत्यूमागील कारणांचा अभ्यास करुन पुढील काळातील सुयोग्य उपचारांसाठी व मृत्यूदर कमी करण्यासाठी त्याचा उपयोग करुन घ्यावा असे निर्देशित केले. आरोग्यशास्त्र हे संशोधन व चिकित्सेवर अवलंबून असल्याने तशा प्रकारे अभ्यास करुन सेवेची गुणवत्ता वाढविण्यावर भर दयावा असे आयुक्तांनी सूचित केले.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने कॅन्सर विषयक तपासण्या केल्या जात असून त्याची नोंद केली जाते तसेच पॉझिटिव्ह रूग्णांवर टाटा ॲक्ट्रेकच्या माध्यमातून पुढील उपचार केले जातात. या विविध प्रकारच्या कॅन्सर तपासण्यांची आकडेवारी आयुक्तांनी जाणून घेतली व सर्व प्रकारच्या कॅन्सर स्क्रिनींगची संख्या वाढवावी असे सूचित केले.

# तळा येथे विद्यार्थी गुणगौरव सोहळा

**तळा : प्रतिनिधी**

रायगड टॅलेंट सर्च (RTS) परीक्षेमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा नुकताच पंचायत समिती तळा येथे उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नथुराम मुकण सभापती, यांनी भूषविले होते. यावेळी उपसभापती रविंद्र मांडवकर ,जि.प.सदस्या नलिनी लोखंडे पंचायत समिती सदस्या अक्षरा कदम या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.कार्यक्रमात गटविकास अधिकारी श्री.गायकवाड , गटशिक्षणाधिरी सुरेखा तांबट , मुबीन वासकर, गौतम मनवर , रविंद्र फडके , महादेव खुळपे , RTS जिल्हाध्यक्ष अमिष भौड, जिल्हा प्रतिनिधी राजू थिटेकर, तालुकाध्यक्ष मितल वावेकर,विजय येलवे,सुनील बैकर,राजेंद्र कुडेकर, सर्व शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सदर प्रसंगीRTS मार्फत level O२ मध्ये यशस्वी विद्यार्थी प्रथम क्रमांक कोमल तुषार वाडेकर शाळाः कळमशेत,द्वितीय क्रमांकअंकुर प्रवीण मंडलिक शाळाः तळे मराठी,तृतीय क्रमांकराज गणेश पावशे शाळाः तळे मराठी ,चतुर्थ क्रमांक शौर्य राजू पठारे शाळाः कळमशेत पंचम क्रमांक ,आकांक्षा किशोर पवार शाळाः कळमशेततसेच तालुक्यातील एकूण १४ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महत्त्वपूर्ण विचार मांडले.RTS चे जिल्हाध्यक्ष अमिष भौड यांनी प्रास्ताविकेतून RTS ची गेल्या दोन वर्षातील प्रगती, उद्दिष्ट तसेच आदरणीय रत्नाकर पाटील यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या RTS ची संकल्पना स्पष्ट केली. गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट यांनी RTS टीमचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्नशील राहावे, असे सांगितले.गटविकास अधिकारी गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना योग्य दिशा देण्यावर भर देत शासनाच्या शैक्षणिक उपक्रमांत सहभाग घेण्याचे आवाहन केले.

# आरटीई प्रवेश निश्चितीसाठी ८ मेपर्यंत अंतिम संधी

**अलिबाग : प्रतिनिधी**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९नुसार दुर्बल व वंचित घटकाकरीता २५ टक्के ऑनलाईन प्रवेश सन २०२६-२७ प्रक्रियेदरम्यान सोडतद्वारे निवड झालेल्या विद्याथ्र्यांना कागदपत्रे पडताळणी व आपला प्रवेश निश्चित करण्यासाठी शुक्रवार (दि. ८) पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. प्रवेश निश्चितीसाठी ही अंतिम मुदतवाढ असल्यामुळे पालकांनी आपल्या पाल्यांची कागदपत्रे तातडीने पडताळणी करून प्रवेश निश्चित करावा, आवाहन रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातर्फे करण्यात आले आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९मधील कलम १२ (सी) (१) नुसार दुर्बल व वंचित घटकांतील बालकांना स्वयं अर्थसहाय्यित शाळा, विना अनुदानित शाळा या शाळांमध्ये आरटीई २५ टक्के सन २०२६-२७ या वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी नावनोंदणी झाल्यानंतर सोडत प्रक्रिया राबविण्यात आली होती. या सोडतीद्वारे निवड झालेल्या विद्याथ्र्यांना आपल्या कागदपत्रांची पडताळणी करण्याठी व आपला प्रवेश निश्चित करण्यासाठी ३० एप्रिलपर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र आता ८ मेपर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे ज्या पालकांनी आपल्या पाल्याचे कागदपत्रे पडताळणी करून पाल्याचा प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) ललिता दहीतुले यांनी केले आहे.




**खोपोली : भाजपच्या प. बंगालमधील यशाचा भाजप कार्यालयासमोर आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ नेते यशवंतशेठ साबळे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, शहराध्यक्ष अजय इंगुलकर, काशिनाथ पारठे, मोहसीन शेख, मुस्तफा नुसते आदी उपस्थित होते.**

## दुखवटा

### गोपीनाथ मुकादम



**नवी मुंबई :** शिव प्रासादिक भजन मंडळ पावणे गावचे भजन कलावंत गोपीनाथ शंकर मुकादम वय वर्षे ६८ यांचे मंगळवारी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात भाऊ वासुदेवबुवा मुकादम व एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर आज पावणे गावातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी भजन तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उरणमध्ये पार्किंग नियम लागू

## नियम मोडल्यास होणार कारवाई



**उरण : प्रतिनिधी, बातमीदार, वार्ताहर**
उरण शहरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी आणि रस्त्यांवरील शिस्तीसाठी नवी मुंबई पोलीस, उरण वाहतूक शाखेने सम-विषम तारीख पार्किंग पद्धत लागू केली आहे. उरण नगरपालिकेच्या वतीने शहरातील प्रमुख रस्त्यांच्या बाजूला सम आणि विषम तारखांचे पार्किंग बोर्ड लावण्यात आले असून नागरिकांनी त्यानुसारच वाहने पार्क करावीत, असे आवाहन पोलीस निरीक्षक, उरण वाहतूक शाखा यांनी केले आहे.

नव्या नियमानुसार ज्या ठिकाणी सम तारखांचे म्हणजेच २, ४, ६, ८, १०, १२, १४, १६, १८, २०, २२, २४, २६, २८, ३० या तारखांचे बोर्ड लावले आहेत, तिथे फक्त त्या सम तारखांनाच वाहने पार्क करता येतील, तर जिथे विषम तारखांचे म्हणजेच १, ३, ५, ७, ९, ११, १३, १५, १७, १९, २१, २३, २५, २७, २९, ३१ या तारखांचे बोर्ड लावले आहेत तिथे फक्त त्या विषम तारखांनाच पार्किंगची परवानगी असेल. या बोर्डांशिवाय इतर ठिकाणी किंवा चुकीच्या दिवशी वाहन पार्क केल्यास मोटार वाहन कायद्यान्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशारा वाहतूक शाखेने दिला आहे.

उरण शहरातील वाढती वाहनांची संख्या आणि अरुंद रस्त्यांमुळे वारंवार वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना बेशिस्त पार्किंगमुळे आपत्कालीन वाहने, बस आणि रुग्णवाहिकांना मार्ग मिळणे कठीण होत होते. ही समस्या लक्षात घेऊन उरण नगरपालिका व वाहतूक पोलिसांनी एकत्रितपणे हा निर्णय घेतला आहे. सम-विषम पार्किंगमुळे रस्त्याच्या एकाच बाजूला वाहने लागतील व दुसरी बाजू वाहतुकीसाठी मोकळी राहील, त्यामुळे कोंडी कमी होण्यास मदत होईल. नागरिकांनी नियमांचे पालन करून वाहतूक पोलिसांना सहकार्य करावे, जेणेकरून उरण शहरातील वाहतूक सुरळीत व सुरक्षित होईल, असे आवाहन उरण वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक यांनी केले आहे.

# उन्हाळ्यात वीजपुरवठा वारंवार खंडित; उपाययोजनेची मागणी

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**
गेल्या काही महिन्यांपासून पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागाचा वीज पुरवठा रात्री बे रात्री देखील खंडित होत असून त्यामुळे वीज ग्राहक संतप्त झाले आहेत. अचानक वीज पुरवठा खंडित होत असल्याने त्याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे.



तालुक्यातील ग्रामीण भागात विजेचा खेळ खंडोबा सुरूच आहे. उन्हाळ्याचे दिवस असल्याने विजेची मागणी वाढली आहे. त्यातच उष्णता देखील प्रचंड जाणवू लागली आहे. मात्र दिवसातून अनेक वेळा वीज पुरवठा खंडित होत आहे. तसेच रात्रीच्या वेळेस देखील वीज गायब होत आहे. दररोज वीजपुरवठा खंडित होत असल्याने वीज ग्राहक संतप्त झाले आहेत.

रात्रीच्या वेळेस तरी अखंड विद्युत पुरवठा महावितरणने द्यावा अशी मागणी केली जात आहे. रात्री अनेकदा वीज जात असल्याने झोपमोड होत आहे तसेच लहान मुलांना विज गेल्यानंतर कसे झोपवावे हा प्रश्न वीज ग्राहकांसमोर उभा राहतो. त्यातच मच्छरांचे प्रमाण वाढल्याने मच्छरदेखील चावत आहेत.

दररोज वीज जाण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढू लागले आहेत मात्र यावर उपाययोजना करण्यात महावितरण सपशेल अपयशी ठरत आहे.

# अश्लील हातवारे करून महिलेचा विनयभंग

**नवीन पनवेल : वार्ताहर**
रिक्षामध्ये पाठीमागे बसलेल्या अनोळखी इसमाने दोन महिलांचा विनयभंग केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात ४ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील फिर्यादी आणि त्यांची बहीण ही भाजी खरेदी करण्यासाठी गेले असता रिक्षा क्रमांक एम एच ४६ १४६६ (पूर्ण क्रमांक नाही) मध्ये पाठीमागे बसलेल्या अनोळखी इसमाने फिर्यादीच्या बहिणीला अश्लील हातवारे केले आणि स्वतःकडे बोलावून तिचा विनयभंग केला. यावेळी फिर्यादी विचारणा करण्यासाठी गेले असता आरोपीने रिक्षामध्ये बसण्यास सांगून त्यांचादेखील विनयभंग केला.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षकांसाठी विविध स्पर्धा रंगल्या



**पनवेल : रामप्रहर वृत्त**
जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षकांसाठी टॅलेंट ओ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिक्षकांनी कलागुण सादर केले.

स्पर्धेसाठी गायन, नृत्य तसेच वाद्य वादन अशा गटांची निर्मिती करण्यात आली होती. या स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघरने प्रथम, सीकेटी ज्युनियर कॉलेज न्यू पनवेलने द्वितीय, सीकेटी विद्यालय इंग्लिश मीडियम न्यू पनवेलने तृतीय क्रमांक मिळवला. रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय खारघरला उत्तेजनार्थ पुरस्कार मिळाला. स्पर्धेचे नियोजन प्राचार्य निशा नायर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडले.

यावेळी चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, सदस्य ॲड. राहुल घरत, प्राचार्य निशा नायर आदी मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमामुळे शिक्षकांमधील कलागुणांना वाव मिळाला.

# रूमच्या बहाण्याने फसवणूक

**नवीन पनवेल : प्रतिनिधी**
रूम न देता पैसेदेखील परत न केल्याप्रकरणी आरोपी मोहम्मद अरिफ (राहणार नेरूळ), मोहम्मद तजमुल अन्सारी (राहणार कळंबोली), जगत नारायण जवाहरलाल कश्यप (राहणार कल्याण), अशपाक सिकंदर मुजावर (राहणार कळंबोली) यांच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात ४ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपींनी एचडीएफसी बँकेने सील केलेले रूम विक्री करण्याचे अधिकार दिलेले नसताना सुद्धा ३ ऑक्टोबर २०२५ ते ४ मे २०२६ पर्यंत फिर्यादी मोहम्मद सलमानी (राहणार रोडपाली सेक्टर १७) यांना एचडीएफसी बँकेचे सील लागलेला रूम देशमुख ब्लासम, ओवेगाव, खारघर हा दाखवला आणि तो रूम कमी किमतीत मिळवून देतो असे सांगून त्यांच्याकडून टोकन म्हणून चार लाख ११ हजार रुपये ऑनलाईन स्वीकारले तसेच फिर्यादी यांच्या ओळखीचे प्रदीप गुप्ता (राहणार कळंबोली) रामभवन जैस्वार आणि उमेश जैस्वार (राहणार तुर्भे) यांना सुद्धा कळंबोली येथे बँकेने सील केलेल्या रूम कमी किमतीत मिळवून देतो असे सांगून त्यांच्याकडून अनुक्रमे दोन लाख आणि आठ लाख रुपये ऑनलाईन स्वीकारले.

तिघांची एकूण १४ लाख ११ हजार रुपयांची फसवणूक केली. त्यांना रूम देखील दिला नाही आणि पैसेही परत केले नाहीत.





**पनवेल : भाजपचे बामणडोंगरी येथील युवा कार्यकर्ते मनोज नाईक यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. सोबत पदाधिकारी व कार्यकर्ते.**

# सीकेटी महाविद्यालयातील प्रा. काकासाहेब ढवळे यांचा सेवापूर्ती गौरव दिन साजरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**
जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त)च्या कर्मचारी कल्याण समितीने महाविद्यालयातील मानव्यविद्याशाखेच्या अर्थशास्त्र विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक काकासाहेब निवृत्ती ढवळे यांचा सेवापूर्ती गौरव दिन समारंभ मंगळवार, दि. २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उत्साहात पार पडला. यावेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांची प्रमुख उपस्थिती राहिली.

सेवापूर्ती समारोहाची सुरवात संस्थेच्या आदर्शस्थानी असणाऱ्या विभूतींचे प्रतिमापूजन आणि दीपप्रज्वलनाने झाली, यानंतर व्यासपीठावरील मान्यवरांचे औपचारिक स्वागत झाल्यानंतर कमर्चारी कल्याण समितीच्या सदस्या डॉ.श्वेता हुंबरवाडी यांनी समितीच्या माध्यमातून आयोजित केल्या जाणाऱ्या विविध कल्याणकारी उपक्रमांचा आढावा दिला तथा समारोहाचे सत्कारमूर्ती प्रा. काकासाहेब निवृत्ती ढवळे यांचा परिचय देत, त्यांच्या संस्थेमधील २७ वर्षांच्या प्रदीर्घ योगदानाचा उल्लेख केला.

समारोहाचे अध्यक्ष जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे यांच्या हस्ते प्रा. काकासाहेब ढवळे यांचा सेवापूर्ती झाल्याबद्दल शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला, याबरोबरच सत्कारमूर्तींच्या सहचारिणी वैशाली ढवळे यांचा सत्कार डॉ. ज्योत्स्ना ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला. याच बरोबर महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभाग तथा त्यांच्या आप्तेष्ट मंडळींकडूनही त्यांचा गौरव करण्यात आला. अध्यक्ष डॉ. एस. टी. गडदे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रा. काकासाहेब ढवळे यांच्या २७ वर्षांच्या प्रदीर्घ, निष्ठावंत आणि समर्पित कार्याचे मनःपूर्वक कौतुक केले.

यावेळी व्यासपीठावर प्राचार्य प्रो. डॉ. एस.के.पाटील, सत्कारमूर्ती प्रा. काकासाहेब ढवळे व त्यांच्या पत्नी सौ. वैशाली ढवळे, प्रो.डॉ. बाळासाहेब आघाव, मानव्यविद्याशाखेचे शाखाधिपती प्रो.डॉ. बाळासाहेब पाटील, वाणिज्यशाखेचे शाखाधिपती प्रो. डॉ. सुधाकर यादव, विज्ञानशाखेच्या शाखाधीपती डॉ. ज्योत्स्ना ठाकूर, कर्मचारी कल्याण समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र परमार, शिक्षक आणि शिक्षकेत्तर सहकारी आणि सत्कारमूर्तींचे आप्तेष्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## शुभेच्छा

**पनवेल : येथील महापालिकेचे नगरसेवक शशिकांत शेळके यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. सोबत नगरसेवक महादेव मधे होते.**

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात अर्थ वीकनिमित्त पर्यावरण जनजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**
जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य विज्ञान महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागाच्या पुढाकाराने आणि नेचर क्लब ऑफ आरटीसीसीएस यांच्या संयुक्त विद्यमाने २२ एप्रिल ते २९ एप्रिल २०२६ दरम्यान अर्थ वीक उत्साहात साजरा करण्यात आला.

पर्यावरणाबाबत जनजागृती करणे आणि शाश्वत जीवनशैलीला प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

सदर आठवड्यात प्लास्टिक कचरा संकलन, वर्मीकंपोस्टिंग आणि वृक्षारोपण मोहीम अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आणि स्वयंसेवकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवून पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व प्रत्यक्ष कृतीतून अधोरेखित केले.

या उपक्रमांद्वारे नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण आणि स्वच्छ पर्यावरणाची गरज याबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली. एकूण ४९ जणांनी या कार्यक्रमात उस्फूर्त सहभाग घेतला होता.

सदर कार्यक्रम यशस्वी पार पडण्यासाठी सर्व शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले होते.





## संपादकीय

# प्रतिमाभंजनाचे 'बूमरँग'!

कोणत्याही कसोटीच्या काळात भाजपचे कार्यकर्ते अधिक जोमाने काम करतात, तर इंडिया आघाडीतील पक्ष मात्र पराजयानंतर गलितगात्र होऊन अधिक दुबळे होतात, असा देशाच्या राजकारणाचा इतिहास आहे.

**पश्चिम बंगाल, आसाम, तमिळनाडू, केरळ ही चार राज्ये आणि पुड्डुचेरीमधील विधानसभा निकालांमुळे भारतीय जनता पक्षाने देशाच्या ७८ टयांहून अधिक लोकसंख्येच्या पसंतीची पहिली पावती मिळविल्याचे स्पष्ट झाले आहेच, पण याच निकालांच्या दुसऱ्या बाजूकडे पाहणेदेखील तितकेच महत्वाचे ठरणार आहे. भारतीय जनता पार्टीस पर्याय देण्यासाठी व भाजपच्या प्रचंड राजकीय शक्तीचा सामूहिकपणे मुकाबला करण्यासाठी एकत्र येऊन 'इंडिया आघाडी' नावाची विरोधकांची मोट बांधण्याच्या प्रयत्नांसही आता खीळ बसली आहे. प्रस्थापितांच्या प्रादेशिक राजकारणाला मतदारांनी नाकारले आहेच, पण केवळ भाजपा विरोधापलीकडे देशहिताचा कोणताही व्यापक विचार नसलेल्या इंडिया आघाडीकडून फारशा अपेक्षादेखील नसल्याचा संदेशही जनतेने ताज्या निकालातून दिला आहे. पंतप्रधान मोदी यांची प्रतिमा हीच भाजपची शक्ती आहे, यावरही शिक्कामोर्तब झाले असून, नरेंद्र मोदी यांच्या प्रतिमेसमोर टिकाव धरू शकेल असा नेता इंडिया आघाडीकडे नाही, हेदेखील जनतेने ओळखले आहे. नरेंद्र मोदी यांची जनमानसातील प्रतिमा हीच त्यांची ताकद असल्यामुळे, मोदींचे प्रतिमाभंजन हाच यापुढे काँग्रेसचा एककलमी कार्यक्रम राहील असे जाहीर वक्तव्य राहुल गांधी यांनी २०१९ मधील लोकसभा निवडणुकीदरम्यान केले होते, आणि पुढे हाच कार्यक्रम राबविण्यावरच काँग्रेसने सतत भर दिला. काँग्रेसच्या आडोशाला आश्रय घेणाऱ्या प्रादेशिक पक्षांनीही राहुल गांधींच्या याच राजकारणाची री ओढली, आणि त्याचे बूमरँग झाले. २०२४ मधील लोकसभा निवडणुकीतील मर्यादित यश वगळता, काँग्रेस आणि इंडिया आघाडीला अनेक निवडणुकांत सातत्याने मतदारांनी झिडकारले आणि प्रत्येक निवडणुकीतील विजयानंतर मोदी यांची प्रतिमा मात्र अधिक उजळत गेली. पश्चिम बंगालमधील ऐतिहासिक विजयानंतर आता इंडिया आघाडीच्या अस्तित्वाचे काही उरलेसुरले अवशेष टिकविण्याची धडपड काँग्रेसला करावी लागणार आहे, तर भाजपाने नव्या विजयाच्या दिशेने दौड सुरूदेखील केली आहे. दक्षिणेकडील राज्यांत सत्तासंपादन हे भाजपचे लक्ष्य आहेच, पण अशी उद्दिष्टे साध्य करण्याकरिता केवळ सत्तेचे राजकारण करणे ही भाजपची राजनीती नाही. अगोदर जनतेचा विश्वास संपादन करणे, जनाधार प्राप्त करणे ही भाजपची नीती यापुढे दक्षिणेकडील राज्यांमध्ये अवलंबिली जाईल, आणि 'एकला चलो रे' या परंपरेने आखून दिलेल्या नीतीनुसार काही पराभव पचवूनही जनतेमध्ये पोहोचण्याचे प्रयत्न जारी राहतील. त्यामुळे यापुढे जेव्हा भाजप अधिक प्रबळ होऊन पक्षाचे कार्यकर्ते नव्या जोमाने संघटनाबांधणी सुरू करतील, तेव्हा काँग्रेस आणि इंडिया आघाडीचे घटक मात्र आपल्या अस्तित्वाच्या घटका मोजत असतील, अशी आजच्या राजकारणाची स्थिती स्पष्ट दिसते. राजकारणातील साम्यवाद्यांची ५० वर्षांची सद्दी दक्षिणेकडील राज्यांतूनही संपल्याचे संकेत मिळू लागले आहेत, आणि त्यांच्यासोबत इंडिया आघाडीलाही घरघर लागली आहे. ममता बॅनर्जी आणि स्टालिन यांच्या द्रमुकला पराभव पाहावा लागल्याने इंडिया आघाडी खिळखिळी झाली आहे. मोदी यांच्या प्रतिमाभंजनाचे स्वप्न पाहणाऱ्या इंडिया आघाडीसमोर आपली प्रतिमा निर्माण करण्याचे व २०२९ मधील निवडणुकीस सामोरे जाताना देशव्यापी भाजपसमोर टिकाव धरण्याचे आव्हान झेलावे लागणार आहे. जेथे जनाधार हीच कोणत्याही राजकीय पक्षाची शक्ती असते, तेथे प्रतिमाभंजनाचे स्वार्थी राजकारण टिकाव धरू शकत नाही, या धड्यातून विरोधकांचे नेते बोध घेतील, तो त्यांच्या भविष्यातील सुदिन ठरेल.**

# कामगारांच्या कल्याणातून घडतोय समृद्ध महाराष्ट्र!




दरवर्षी १ मे महाराष्ट्र दिन हा कामगार दिन म्हणूनही उत्साहाने साजरा केला जातो. देशात महाराष्ट्र हा अतिशय कुशल अशा कामगारांचा प्रांत म्हणून ऐतिहासिक काळापासून ओळखला जातो. देशाला दिशादर्शक अशा अनेक कामगार कायद्यांची निर्मिती महाराष्ट्राने केली आहे. कामगारांचे कायदे, कामगारांच्या संघटना, कामगारांसाठी आरोग्य व अन्य सुविधा आणि कामगारांच्या कुटुंबीयांना देखील मोठ्या प्रमाणात सुविधा देणारे प्रगत राज्य म्हणून महाराष्ट्राचे नाव घेतले जाते. त्यामुळे एक मे रोजी कामगार दिन साजरा करताना संघटित, असंघटित सर्व क्षेत्रातील कामगारांनी आपल्या कायद्यांची माहिती करुन घेणे आवश्यक आहे. केंद्र व राज्य शासनाने तयार केलेल्या सर्व कायद्यांचा कामगारांना लाभ होण्यासाठी कामगार विभाग कटिबद्ध असून कामगारांच्या कल्याणातूनच समृद्ध महाराष्ट्र घडत आहे.

कामगारांच्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी, त्यांच्या सर्वांगीण उत्थानासाठी नाविन्यपूर्ण आणि दूरदर्शी योजना, दूरदर्शी उद्दिष्टे आणि हितकारक धोरणे परिणामकारकरित्या राबवून महाराष्ट्राने इतर राज्यांसाठी आदर्श निर्माण केला आहे. राज्याच्या सर्वांगीण प्रगतीतही हा विभाग मोलाचे योगदान देत आहे. या विभागांतर्गत संघटीत व असंघटीत कामगारांसाठी व्यापक स्वरुपात काम केले जात असून, त्यांच्या कल्याणासाठी कामगार कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी व विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे.

**विभागाचे उद्दिष्ट व कार्य**

औद्योगिक संबंध अधिक दृढ करणे, कामगारांचे हक्क सुरक्षित ठेवणे आणि औद्योगिक सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण करणे ही कामगार विभागाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. राज्यातील कामगारांसाठी आवश्यक कायदे तयार करणे आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे काम या विभागामार्फत सातत्याने केले जाते. औद्योगिक वादांचे प्रतिबंध व तातडीने निराकरण करण्यासाठीही हा विभाग कटिबद्ध आहे. तसेच विभागाच्या कार्यक्षेत्रातील उद्योगांमध्ये कामगारांची सुरक्षा, त्यांचे आरोग्य आणि कल्याणासाठी प्रोत्साहन दिले जाते.

**कामगारांना संरक्षण**

कामगारांसाठी शासनाने चार महत्त्वपूर्ण कामगार संहितांद्वारे संरक्षण दिले आहे. यामध्ये वेतन संहिता, औद्योगिक संबंध संहिता, व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कार्यस्थिती संहिता आणि सामाजिक सुरक्षा संहिता यांचा समावेश होतो. या संहितांमुळे कामगारांचे किमान वेतन, कामाच्या वेळा, बोनस यांसारख्या महत्त्वाच्या बाबी निश्चित करण्यात आल्या आहेत. तसेच नव्याने कामगारांना नियुक्तीपत्र देणे बंधनकारक करण्यात आले असून, पारदर्शकता वाढीस लागली आहे. सामाजिक सुरक्षा संहितेमध्ये प्लॅटफॉर्म वर्कर्स- उदा. स्विगी, ॲमेझॉनसारख्या घरपोच सेवा देणाऱ्या कामगारांसाठी देखील स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या वतीने नव्या नियमावलीचा मसुदा- कामगार क्षेत्रातील कायदे अधिक सुलभ आणि प्रभावी करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने कामगार दिनाच्या पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. केंद्र सरकारच्या संहितांच्या धर्तीवर राज्य शासनाने राज्यासाठी नवीन नियमावलीचा मसुदा प्रसिद्ध केला आहे. तसेच दोन्ही मसुद्यांवर हरकती व सूचना मागवल्या आहेत.

औद्योगिक आस्थापनांमधील कामगार आणि मालक यांच्यातील संबंधांचे नियमन करणे आणि वेतनाबाबतच्या तरतुदी स्पष्ट करणे, हे या नव्या नियमावलीचे मुख्य उद्दिष्ट आहे. या नियमांच्या अंमलबजावणीमुळे राज्यातील औद्योगिक वातावरणात पारदर्शकता आणि सुसूत्रता येण्यास मदत होणार आहे.

**कल्याणकारी मंडळांची स्थापना**

कामगार विभागामार्फत कामगारांसाठी विविध कल्याणकारी मंडळांची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामध्ये कोल्हापूर कामगार विभागाच्या कार्यक्षेत्रातील सुमारे १ लाख ३६ हजार ९४० कामगारांची सक्रिय नोंदणी आहे. नोंदणीकृत कामगारांच्या पाल्यांना शैक्षणिक अर्थसहाय्य योजना, आरोग्यविषयक योजना, सामाजिक सुरक्षा योजना व आर्थिक सहाय्य योजना यांद्वारे विविध आर्थिक व वस्तुरूप लाभ दिले जात आहेत.

महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळामध्ये कामगारांची सक्रिय नोंदणी केली जात असून, नोंदणीकृत कामगारांपैकी ५५ ते ६० वर्षे वयोगटातील घरेलू कामगारांना सन्मानधन योजनेंतर्गत १० हजार रुपये आर्थिक सहाय्य दिले जात आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी घरेलु कामगारांनी कामगार विभागाकडे नोंदणी करावी, असे आवाहन कोल्हापूरचे सहायक कामगार आयुक्त विशाल घोडके यांनी केले आहे.

**विभागाची प्रमुख कार्यालये**

कामगार विभागाच्या कार्यक्षेत्रात कामगार आयुक्तालय, असंघटित कामगार विकास आयुक्त कार्यालय, औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य निदेशालय, स्टीम बॉयलर्स निदेशालय, महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळ, महाराष्ट्र राज्य बांधकाम व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ तसेच नारायण मेघाजी लोखंडे कामगार विज्ञान संस्था यांसारखी प्रमुख कार्यालये कार्यरत आहेत. ही सर्व यंत्रणा समन्वयाने काम करत कामगारांच्या हिताचे रक्षण करत आहे.

कामगार विभागाच्या वतीने संघटीत व असंघटीत कामगारांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना आणि कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे औद्योगिक सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण होत आहे. तसेच राज्याच्या आणि देशाच्या सर्वांगीण विकासात कामगार विभागाचे योगदान अधिकाधिक बळकट होत आहे.

**-वृषाली पाटील,**
सहायक संचालक (माहिती),
विभागीय माहिती कार्यालय,
कोल्हापूर

# लेखिका मालती बेडेकर



मालती विश्राम बेडेकर या महाराष्ट्रातील एक मराठी लेखिका होत्या. मराठी साहित्यातील त्या पहिल्या प्रमुख स्त्रीवादी लेखिका होत्या. त्यांचा जन्म १८ मार्च १९०५ रोजी रायगड जिल्ह्यातील आवास येथे झाला. हिंगण्यातील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत त्यांचे शिक्षण झाले. तिथे त्यांच्यावर महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या पुरोगामी विचारांचा प्रभाव पडला. त्या शिक्षण संस्थेची स्थापना कर्वे यांनी केली होती. याच संस्थेतून मालतीबाईंनी महाविद्यालयीन शिक्षणही पूर्ण केले. त्यांचे माहेरचे नाव बाळूताई खरे असे होते. विश्राम बेडेकरांशी १९३८ साली त्यांचा विवाह झाला. त्या आपले लेखन विभावरी शिरूरकर ह्या नावाने प्रसिद्ध करायच्या. 'महिला सेवाग्राम'शी संबंधित असताना अनेक अनाथ, विधवा, परित्यक्तांच्या समस्या त्यांनी अनुभवल्या-अभ्यासल्या. सहृदयतेनं त्यावर मार्ग काढण्याचाही प्रयत्न केला. यातून दुःखी स्त्रीजीवनाशी त्यांचा जवळून परिचय झाला. या दुःखालाच त्यांनी कादंबरीचं रूप दिलं; मात्र हे लेखन त्यांनी मालतीबाई बेडेकर नावानं न करता 'विभावती शिरूरकर' या नावानं केलं, कारण त्या काळात स्त्रीजीवनाचं असं खरखुरं चित्रण खळबळजनक ठरलं.

अलंकारमंजूषा, हिंदू व्यवहार धर्मशास्त्र हे त्यांचे आरंभीचे ग्रंथ होते. पुढे स्त्रियांच्या जाणिवा मांडणारा 'कळ्यांचे निःश्वास' हा त्यांचा पहिला कथासंग्रह आला. 'हिंदोळ्यावर', 'विरलेले स्वप्न', 'बळी', 'जाई', 'शबरी' या कादंबऱ्या या दृष्टीने महत्वाच्या आहेत. 'पारध', 'हिरा जो भंगला नाही', ही नाटकं, 'घराला मुकलेल्या स्त्रिया' हा समाजशास्त्रीय संशोधनात्मक लेख आणि 'स्त्रीजीवनावरील मनस्विनीचे चिंतन' हा निबंधसंग्रह एवढं त्यांचं लेखन आहे. त्यांच्या 'बळी' 'शबरी ' आणि 'घराला मुकलेल्या स्त्रिया' या पुस्तकांना राज्य शासनाची पारितोषिकं मिळाली आहेत. त्यांच्या बहुतेक कादंबऱ्यांची गुजरातीत भाषांतरे झाली आहेत. मालती बेडेकर यांचे ७ मे २००१ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## बदलते तंत्रज्ञान

# ज्येष्ठांना सायबर धोका... हे उपाय करतील सुरक्षा



ठग आता ओटीपी किंवा वीज बिलासारख्या फसवणुकीपुरते मर्यादित राहिलेले नाहीत,अशा परिस्थितीत वृद्ध कसे वाचतील? यामध्ये नुकत्याच आलेल्या 'अभय' नावाच्या एआय चॅटबॉटसारखे तंत्रज्ञान मदत करू शकते. चला, नवीन तंत्रज्ञान आणि फसवणुकीच्या नवीन पद्धतींपासून संरक्षणाबद्दल जाणून घेऊया.'अभय' अशा प्रकारे करा वापर

नोटीसची खरी ओळख करेल.अभय हा एआय-शक्तीवर चालणारा नोटीस पडताळणी चॅटबॉट आहे. सीबीआयच्या नावाने येणाऱ्या संशयास्पद नोटीस, मेसेज-कॉलला तो डेटाबेसशी त्वरित जुळवून तपासेल.

**क्यूआर कोडद्वारे सुरक्षा देईल**

सीबीआयच्या प्रत्येक नोटीसवर आता क्यूआर कोड असेल. जर स्कॅमर्सनी क्यूआर कोड असलेली नोटीस पाठवली, तर चॅटबॉटने स्कॅन करताच सत्य समोर येईल.

**योग्य निर्णय घेण्यास मदत करेल**

डिजिटल अरेस्टच्या वेळी स्कॅमर्स अनेक मार्गांनी वृद्धांना घाबरवतात. अशा परिस्थितीत अभय वापरकर्त्यांना शांत राहण्यास आणि योग्य निर्णय घेण्यासही मदत करेल.

मोबाईलमध्ये ही खबरदारी तुम्हाला डिजिटल अरेस्टसारख्या फसवणुकीपासून वाचवेल

**१. डीएनडी सेवा सक्रिय करा:** तुमच्या स्मार्टफोनमध्ये ट्रायची डीएनडी सेवा सक्रिय ठेवा. यासाठीच्या सेटिंग्जसाठी मेसेज बॉक्समध्ये जा. मोठ्या अक्षरात 'FULLY BLOCK' असे लिहून १९०९ वर पाठवा. यानंतर व्यावसायिक-स्पॅम कॉल येणे बंद होतील. अँड्रॉइड आणि आयफोन दोन्हीमध्ये डू नॉट डिस्टर्बचे बटण असते.

**२. स्पॅम कॉल-मेसेजपासून बचाव करा:** फोनमध्ये स्पॅम कॉल-मेसेज फिल्टर चालू ठेवा. अँड्रॉइडमध्ये हा पर्याय मेसेज सेटिंग्जमधील स्पॅम प्रोटेक्शनमध्ये मिळेल. आयफोनमध्ये फिल्टर अननोन सेंडर्स चालू करा. ज्यावर स्पॅम असे लिहिलेले असेल, तो कॉलही स्वीकारू नका.

**३. व्हॉट्सॲपमध्ये ऑटो डाउनलोड बंद ठेवा:** व्हॉट्सॲपच्या सेटिंग्जमध्ये जाऊन मीडिया ऑटो डाउनलोड बंद ठेवा. जेणेकरून कोणताही संशयास्पद फोटो किंवा व्हिडिओ आपोआप डाउनलोड होऊ नये. सायलेंट अननोन कॉल देखील चालू ठेवा. तुमच्या मोबाईल फोनमध्ये बँकिंग ॲप्स आणि गुगल पे किंवा फोनपेसारख्या पेमेंट ॲप्सवर फिंगरप्रिंट किंवा फेस लॉक नक्की लावा.

# संगीतसम्राट पं. तानसेन



## निमित्त

पं.तानसेन ऊर्फ रामतनु ऊर्फ तन्नामित्र, त्रिलोचन, तनसुख यांचा जन्म इ.स. १५३२, बेहट येथे तर मृत्यू ६ मे १५८९ रोजी झाला. ते अकबराच्या दरबारातील प्रसिद्ध नवरत्नांपैकी एक रत्न होते. पं. तानसेन हे संगीतशास्त्रात निपुण होते.त्यांना'मियां तानसेन' असेसुद्धा म्हणत.

पं. तानसेन यांच्या वडिलांचे नाव मकरंद पांडे होते. त्यांच्याकडेच पं. तानसेन ह्यांचे प्रारंभिक शिक्षण घेतले. सुफी संत गौस मोहंमद यांचेही त्यांना मार्गदर्शन लाभले. त्यानंतर त्यांनी वृदांवन येथील गुरू स्वामी हरीदास्यांचे शिष्यत्व स्वीकारलेते. त्यांच्याकडून. पं तानसेन यांनी २००च्या पेक्षा अधिक धृपदे आत्मसात केली. त्यांच्याकडे पं. तानसेन यांनी सुमारे १० वर्षे संगीताचे शिक्षण घेतले. तानसेन यांचा आवाज अतिशय गोड पण मर्दानी व पल्लेदार होता. मीयां मल्हार, मीयां का सारंग व मीयां की तोंडी ह्यासारखे नवीन राग तानसेन यांनी शोधुन काढले. रबाब नावाचे वाद्य त्यांनी तयार करून विकसीत केले. संगीतसार व रामाला हे दोन ग्रंथ पं. तानसेन यांनी लिहिले.

पं. तानसेन हे एक उत्तम गायक होता. त्यामुळे रेवा संस्थान नरेश राजा रामचंद्र यांनी तानसेन यांना राजगायक म्हणून नेमले होते व नंतर अकबर बादशहाने खूप सारे सोने देऊन पं. तानसेन यांची मागणी केली ज्याला रामचंद्र नाही म्हणू शकले नाहीत. अकबराला न दुखवण्यासाठी त्यांनी भेट म्हणून पं.तानसेन ह्यांना देउन टाकले.


पं. तानसेन हे अकबर बादशहा याच्या दरबारातील नवरत्नापैकी एक होते. त्यांच्या पत्नीचे नाव हुसेनी होतो. त्यांना चार मुले व एक मुलगी होती. सुरतसेन, शरदसेन, तरंगसेन व विलास खान आणि मुलगी सरस्वती असे होते.

तानसेनाचे गुरू नक्की कोण याबाबतीतही दुमत आहे. जुने हिंदू व मुस्लिम संदर्भ वेगवेगळी नावं देतात. त्यानुसार काही जण त्यावेळचे वृंदावनमधील संत हरिदास हे तानसेनाचे गुरू मानतात तर काही जण सूफी संत मुर्शिद महम्मद घौस (ग्वालियरी) यांना त्याचे गुरू मानतात. पण संत हरिदासांना गुरू असल्याचं मानणार्यांचं पारडं जड आहे. त्यामुळे पुढे कुणीतरी अशीही एक आख्यायिका जोडून दिलेली दिसते की 'तानसेन लहानपणी मुका होता. एकदा ग्वाल्हेरला गेलेला असता तो महम्मद घौस यांना भेटला. तिथेच सोबत संत हरिदासही बसले होते. महम्मद घौस यांनी तन्नाच्या मुखात फुंकर मारली आणि तो बोलू लागला. लगेचच त्यांनी स्वामी हरिदास यांना तन्नाला संगीत शिकवायला सांगितलं'. परंतु ह्या कथेत फारसं तथ्य नसावं. शिवाय तन्नाचे वडील एक कवी व संगीतकार होते, त्यामुळे तन्नाचं प्राथमिक संगीत शिक्षण वडिलांकडेच झालं असणार. त्यानंतर ध्रुपद गायकी करणारे स्वामी हरिदास हे तानसेनाचे गुरू झाले असावेत. जाता जाता सांगायची गोष्ट, स्वामी हरिदासांची भेट दक्षिणेतील संत पुरंदरदासांशी (तेच ते, ज्यांना कर्नाटकी शास्त्रीय संगीताचे आद्य प्रवर्तक मानलं जातं, त्यांची रचना 'भाग्यदा लक्ष्मी बारम्मा' सर्वश्रुत आहे) झाली होती. त्यांच्या संगीताचा प्रभाव हरिदासांच्या ध्रुपद गायकीवरही पडला होता. त्याशिवाय तानसेनाच्या गायकीवर महम्मद घौस यांच्या सूफी संगीताचा प्रभावसुद्धा होता. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर



# हृदयविकाराचा झटका टाळण्यासाठी ही काळजी घ्या

हिवाळ्यात हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी आजारांमुळे हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका वाढतो, असे तुम्ही अनेकदा वाचले असेल. हिवाळ्याबरोबर उन्हाळ्यातसुद्धा हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका वाढू शकतो, असे हृदयरोगतज्ज्ञ सांगतात. द इंडियन एक्स्प्रेसनी तज्ज्ञांच्या हवाल्याने याविषयी सविस्तर माहिती सांगितली आहे.

नोएडा इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस येथील मेडिसीन विभागाचे सहाय्यक प्राध्यापक, हृदयरोगतज्ज्ञ डॉ. जगदा नंद झा सांगतात, उन्हाळ्यात हृदयाला सामान्य दिवसांपेक्षा दोन ते चार पट जास्त रक्ताभिसरण करावे लागते. जर शरीर थंड झाले नाही तर त्या व्यक्तीला उष्माघात होण्याचा धोका असतो, जे जीवघेणे ठरू शकते. उष्माघात कोणालाही होऊ शकतो, पण ज्या लोकांना हृदयाशी संबंधित आजार आहे, त्यांना याचा धोका अधिक असतो.

**उन्हाळ्यात कोणती काळजी घ्यावी?**

◆ अतिप्रमाणात व्यायाम करू नका. उन्हाळ्यात शरीराचे तापमान वाढते, त्यामुळे हृदयावर ताण येतो. जर अति कठोर व्यायाम केला तर हृदयविकाराचा धोका वाढू शकतो.

◆ उन्हाळ्यात जास्तीत जास्त प्रमाणात पाणी प्या. यामुळे शरीराच्या तापमानात समतोल राखण्यास मदत होते.

◆ उन्हाळ्यात अल्कोहोल आणि कॅफिन घेणे टाळा, यामुळे निर्जलीकरण होऊ शकते.

◆ संतुलित आहार घ्या. ताजी फळे, भाज्या, धान्ये, कडधान्ये, मसूर आणि शेंगांचा आहारात समावेश करा. जंक, मसालेदार, तेलकट पदार्थ खाणे टाळा.

◆ तुमच्या आहारातील सॅच्युरेटेड आणि ट्रान्स फॅट्सचे प्रमाण कमी करा.

◆ आहारात जास्तीत जास्त फळांचा आणि भाज्यांचा वापर करा.

◆ आहारात फायबरचे प्रमाण वाढवा.

◆ याशिवाय गोड पदार्थ खाणे टाळा.

◆ कमी फॅट्सयुक्त किंवा फॅट्स नसलेल्या दुग्धजन्य पदार्थांचा आहारात समावेश करा.

# श्रीवर्धनमध्ये पाणीटंचाईवरून विशेष सभा गाजली

## ■ समस्या मार्गी लावण्याची एकमुखी मागणी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन नगरपरिषदेची विशेष सर्वसाधारण सभा सोमवार दि. ४ मे रोजी महाराष्ट्र भूषण आदरणीय तीर्थरूप डॉ. नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात पार पडली. पाणीटंचाईच्या तीव्र पार्श्वभूमीवर ही सभा अत्यंत वादळी ठरणार, अशी चर्चा आधीपासूनच शहरात रंगली होती आणि प्रत्यक्षातही सभेत तीच स्थिती पाहायला मिळाली.



सभेपूर्वीच दि. १ मे रोजी शिवसेना (शिंदे गट) नगरसेवकांनी एकदिवसीय लाक्षणिक उपोषण छेडत पाणीप्रश्न तीव्रतेने मांडला होता. श्रीवर्धन शहरात सतत फुटणाऱ्या जलवाहिन्यांमुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून नागरिकांना अक्षरशः पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे.

सभेत शिवसेना गटनेते देवेंद्र भुसाणे यांनी प्रशासनावर जोरदार हल्ला चढवला."२४ कोटी रुपयांची पाणी योजना असूनही नागरिकांना पाण्यापासून वंचित राहावे लागते, हे दुर्दैवी आहे. अंदाजे ७० ते ८० वेळा पाईपलाईन फुटली आहे. हा थेट जनतेच्या खिशावर डाका आहे," असा आरोप त्यांनी केला.

नगरसेवक संतोष वेश्वीकर यांनी ही योजना प्रशासकीय कालावधीत राबवली गेली असल्याने, जर यात भ्रष्टाचार किंवा निकृष्ट दर्जाचे काम झाले असेल तर संबंधितांवर कठोर कारवाई व्हावी. त्यांनी पुढे संबंधित ठेकेदार कंपनीला ब्लॅकलिस्ट करण्याची मागणी केली.

नगरपरिषद कायद्यानुसार (महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५) नागरिकांना मूलभूत सुविधा विशेषतः पाणीपुरवठा सुरळीत देणे ही स्थानिक स्वराज्य संस्थेची प्राथमिक जबाबदारी आहे. जर योजनांमध्ये निकृष्ट काम, आर्थिक अनियमितता किंवा कर्तव्यच्युती आढळली, तर संबंधित अधिकारी, ठेकेदार यांच्यावर प्रशासकीय व फौजदारी कारवाई होऊ शकते.सभेत मांडण्यात आलेले आरोप गंभीर स्वरूपाचे असून, त्यासाठी स्वतंत्र चौकशी किंवा तांत्रिक लेखापरीक्षण करण्याची मागणी पुढे येण्याची शक्यता आहे.

या योजन`चया अंमलबजावणीच्या काळातील मुख्याधिकारी व संबंधित अधिकारी सभेला अनुपस्थित असल्याने अनेक प्रश्न अनुत्तरित राहिले. त्यामुळे सभेत नाराजीचे वातावरण निर्माण झाले.

पाणीपुरवठा सभापती हरिदास वाघे यांनी सर्वांना आवाहन केले की, वाद बाजूला ठेवून पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी उपाययोजनांवर लक्ष केंद्रित करावे. प्रशासनाकडून सध्या लाईन प्रेशर नियंत्रण, एअरव्हॉल बदल, पंपिंग प्रेशर सुधारणा अशा उपाययोजना सुरू असल्याचे सांगण्यात आले. नगराध्यक्ष तथा पीठासीन अधिकारी अतुल चौगुले यांनीही सर्व सदस्यांना एकमताने मार्ग काढण्याचे आवाहन केले.

# कशेळे गावाच्या हद्दीत आढळला मृतदेह



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातून जाणाऱ्या मुरबाड राष्ट्रीय महामार्गावर कशेळे गावच्या हद्दीत मृतदेह आढळून आला आहे. सदर मृतदेह अज्ञात व्यक्तीचा असून पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतला आहे. या घटनेने परिसरात खळबळ माजली आहे.

कर्जत मुरबाड मार्गा लगत अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. कशेळे गावाजवळून जाणाऱ्या वाहनचालकांना रस्त्याच्या कडेला एक मृतदेह पडलेला दिसून आला. तसेच दुर्गंधी पसरल्याने,ही बाब लक्षात येताच स्थानिकांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली.

प्राथमिक पाहणीमध्ये संबंधित मृत व्यक्तीचे वय अंदाजे ५० ते ६० वर्षांच्या दरम्यान असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. .मृतदेहाची अवस्था पाहता या व्यक्तीचा मृत्यू साधारण दोन ते तीन दिवसांपूर्वी झाला असावा. असा अंदाज व्यक्त केला जात आहे. मृतदेह सडलेल्या अवस्थेत असल्यामुळे ओळख पटविण्यात अडचणी येत आहेत.मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होणार आहे.

या घटनेची माहिती मिळताच कर्जत पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक अधिकारी अनिल सोनोने तसेच पोलिस अधिकारी आणि पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेण्यात आला आहे. पुढील तपास सुरू असून मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# महड येथे वरदविनायकाच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**चौकः प्रतिनिधी**

अंगारकी चतुर्थी निमित्ताने आज अष्ठविनायक श्री क्षेत्र महड येथे वरद विनायकाचे दर्शन घेण्यास भाविकांची प्रचंड गर्दी झाली आहे.



मे महिना सुरू झाला असून विद्यार्थी यांना सुट्टी पडली आहे, सुट्टीचा आनंद आणि अष्टविनायक महड येथे वरद विनायकाचे दर्शन घेण्यासाठी पहाटे पासून भाविकांची प्रचंड गर्दी झाली आहे. गणपती बाप्पा ची मोगरा फुलांनी आरास सजवली आहे, त्यामुळे भाविकांना दर्शन घेताना एक वेगळाच आनंद मिळत असून, मोगऱ्याने अतिशय प्रसन्न वातावरण निर्माण झाले आहे.

आज अंगारक संकष्ट चतुर्थी ही मंगळवारी आल्यामुळे अत्यंत पवित्र आणि शुभ मानली जाते. या दिवशी गणपती बाप्पाच्या उपासनेने सर्व संकटे दूर होऊन मनोकामना पूर्ण होतात. या दिवशी उपवास, गणेश पूजा आणि चंद्र दर्शनाने विशेष पुण्य मिळते आणि कुंडलीतील मंगळ दोषही दूर होऊ शकततो अशी धारणा आहे.

गणपतीची कृपा होऊन जीवनातील सर्व अडचणी, कर्जमुक्ती आणि आर्थिक बाबी सुरळीत होण्यास मदत मिळते.आज गणपती बाप्पाला दुर्वा, सिंदूर आणि मोदक अर्पण करून विशेष पूजा केली जाते. अतिशय कडक उन्हात देखील प्रचंड रांग आहे, मंदिर व्यवस्थापन यांनी सुंदर नियोजन केले असून भाविक देखील कडक उन्हात रांगेत उभे राहिले आहेत.

# अंगारक चतुर्थीला बल्लाळेश्वरच्या दर्शनासाठी पालीमध्ये भाविकांच्या रांगा

**पाली : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील प्रख्यात धार्मिक स्थळ असलेल्या अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत अंगारकी संकष्टी चतुर्थीला मंगळवारी (ता.०५ ) भाविकांनी गर्दी केली होती. श्री. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पहाटे पासूनच लांब रांगा लागल्या होत्या. अंगारकी चतुर्थी निमित्त रायगड सह राज्य व देशभरात गणेश भक्तांकडून उपवास, पूजा आणि मंदिरांमध्ये दर्शनासाठी मोठी गर्दी होत आहे. विशेषतः महाराष्ट्रात भाविक पहाटेपासूनच रांगा लावत असून, मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. सुरक्षा व्यवस्था आणि विशेष सोयी प्रशासनाकडून करण्यात आल्या आहेत.



पालीत अंदाजे २५ हजार हून अधिक भाविक दाखल झाले होते. विशेष म्हणजे जिल्ह्याच्या अनेक भागातून पायी दिंडी आल्या होत्या.उन्हाळी सुट्ट्यामुळे भाविक , पर्यटक गणेशभक्त बल्लाळ नगरीत उत्स्फुर्त व भक्तिभावाने दाखल झाले होते. यावेळी आलेल्या दिंडीतील भक्तीमय वातावरणात लहान मुले, आबाल वृद्ध, महिला, तरुण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

श्री. बल्लाळेश्वर मंदिर व गाभाऱ्यात फुलांची सजावट करण्यात आली होती. श्री. बल्लाळेश्वरला देखील आभूषण व वस्त्र परिधान करण्यात आले होते. तसेच मंदिरा बाहेर रांगोळी देखील काढण्यात आली होती. श्री. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रभरातून व भारतातून भाविक दाखल झाले होते. यामुळे येथे चांगली आर्थिक उलाढाल झाली असून येथील स्थानिक व्यावसायिक सुखावले आहेत. पाली नगरी भाविकांनी फुलून निघाली होती. सर्वत्र गणरायाचा जयघोष कानी पडत होता.

भाविकांमुळे येथील हॉटेल व्यावसायिक, लॉजिंग बोर्डिंग वाले, पापड, लोणचे मिरगुंड विक्रेते, पेढेवाले, छोटे मोठे दुकानदार व इतर व्यावसायिकांचा धंदा तेजीत होता. मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते. भाविकांच्या सोयीसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती. विविध वस्तूंनी भरलेली दुकाने व गर्दी यामुळे मंदिर परिसर गजबजलेला दिसत होता. मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते. अनेक भाविक स्वतःची वाहने घेवून आले होते.


### खोपोली नगरपरिषद

खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड, पीन कोड नं. ४१०२०३
फोन नं. (०२१९२) २६२२२२, २६३३५६. फॅक्स–०२१९२–२६४२११
Email ID :- cokmckhopoli@gmail.com

जा.क्र. केएमसी/पापू/५०३ दिनांक : ०५/०५/२०२६

**खुली ई–निविदा सूचना**

मुख्याधिकारी, खोपोली नगरपरिषद, खोपोली हे " खोपोली नगरपरिषदेच्या अग्निशमन सेवेच्या बळकटीकरणा करिता अग्निशमन केंद्राजवळ उंचावरील सलोह जलकुंभ बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणे " या रु.२६,२८,७१७/– अंदाजपत्रकीय रक्कमेच्या कामाकरीता शासकीय नोंदणीकृत, अनुभवी व अर्हताप्राप्त अभिकारक यांसकडुन ब–१ नमुन्यात online पद्धतीने ई–निविदा मागवित आहेत. सदरील कामाची ई–निविदा व आवश्यक सर्व माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ०६/०५/२०२६ ते दि. १४/०५/२०२६ या कालावधीत उपलब्ध असेल.

सही/–
**उप नगर अभियंता,**
खोपोली नगरपरिषद, खोपोली

### सावधान नोटीस

तमाम जनतेस या सावधान नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, **श्री. विश्वनाथ तुकाराम पाटील वगैरे यांच्या नावे असलेली जमीन मिळकत मौजे जांभुळपाडा, ता. उरण, जि. रायगड येथिल सर्व्हे नं. ५६/७ /अ, क्षेत्र ०.३७.२०, पो. ख. ०. ०२.३० आकार ३.०८, व जुना सर्व्हे नं. १४०/७ अ क्षेत्र ०.३७.२, पो. ख. ०.०२.३ आकार ३.०८ हि मिळकत आहे.**

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्यापुढे नमूद जमीन मालकांनी आमच्या अशिलांना **सौ. मौसमी रंजनकुमार दास** यांना नोंदणीकृत साठेकरारा व्दारे विक्री करण्याचे मान्य करुन त्यापोटी आमच्या अशिलांकडून बरीच मोठी रक्कम स्विकारलेली आहे. परंतु, सदर जमीन मालक सदर व्यवहार पूर्ण करण्यास टाळाटाळ करीत असून अनाधिकाराने सदर मिळकतीमध्ये त्रयस्थांचे हक्क, हितसंबंध निर्माण करण्याच्या प्रयत्नात असल्याचे आमच्या अशिलांना समजले आहे. सबब, प्रस्तुतची सावधान नोटीस आमचे अशिल प्रसिध्द करीत आहेत.

सदर जमिन मिळकतीबाबत **सौ. मौसमी रंजनकुमार दास** यांनी जमिन मालकांच्या साठेकरार केलेला असून त्याअनुषंगाने आमच्या अशिलांनी त्यांच्या विरुध्द **पनवेल येथील मे. दिवाणी न्यायालयात रे. मु. नं. २९९/२०२५** हा दावा दाखल केलेला आहे. सदर दावा अद्याप न्यायप्रविष्ठ असून त्याची पुढील तारीख १०/०६/२०२६ अशी नेमलेली आहे.

**सबब, तमाम जनतेस या नोटीसीने सावधान करण्यात येत आहे की,** वर नमुद जमिन मिळकतीबाबत **श्री विश्वनाथ तुकाराम पाटील वगैरे** अथवा इतर कोणत्याही इसमांबरोबर कोणत्याही स्वरुपाचा करार / मदार / व्यवहार करु नये आणि केल्यास असा व्यवहार बेकायदेशिर ठरेल व तो आमच्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि. ५/०५/२०२६.
सही/–
**ॲड. रेणुका एम. पाटील**
यशोकिरण सोसायटी, शॉप नं. ८, ए. विंग, पहिला मजला, सावरकर चौक, पनवेल


# रायगड जनता नागरी सहकारी पतपेढीच्या माणगाव शाखेचे उद्या उद्घाटन

**माणगाव : प्रतिनिधी**

सहकार क्षेत्रातील अग्रगण्य पतसंस्थांपैकी एक ओळखल्या जाणाऱ्या रायगड नागरी सहकारी पतपेढी मर्यादीत या पतसंस्थेच्या माणगाव शाखेचा उद्घाटन समारंभ गुरुवार दि. ७ मे २०२६ रोजी सकाळी ११. वा राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री ना. भरत गोगावले व महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं समुह पुनर्विकास प्राधिकरण अध्यक्ष ना. प्रविण दरेकर यांच्याहस्ते माणगांव याठिकाणी आयोजित करण्यात आले आहे.

या पतसंस्थेची स्थापना सन १९८३ मध्ये करण्यात आली .या संस्थेच्या लालबाग , घाटकोपर, गोरेगांव ( मुंबई ) , ठाणे , कल्याण ,विरार , महाड, कामोठे , अंबरनाथ, पोलादपूर , डोंबिवली अशा ११ ठिकाणी शाखा असून आता माणगावची १२वी शाखा सुरु होत आहे . या माणगाव शाखेच्या उद्घाटन कार्यक्रमास राजीपचे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती अँड . राजीव साबळे , नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे , उपनगराध्यक्षा रिया उभारे, राजिपचे अर्थ खात्याचे सभापती चंद्रकांत कळंबे , नगरसेवक तसेच विविध क्षेत्रातील नागरीक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत .

या उद्घाटन समारंभास मान्यवरांनी तसेच नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संस्थेतर्फे संस्थापक अध्यक्ष नरहरी गोळे,उपाध्यक्ष पांडुरंग साळवी,सचिव दत्ताराम जंगम,रामचंद्र धनावडे,सुवर्णा कदम, भाऊ जाधव,पांडुरंग साळेकर यांनी केले आहे.


| RESIDENTIAL BANGLOW ON PLOT NO. 50 ON SURVEY NO. 70/2, 70/3, 71/1, 71/2A, 71/3 AT VILLAGE-WARDOLI, TAL. – PANVEL, DISTRICT - RAIGAD. | |
|---|---|
| NAME AND THE ADDRESS OFTHE OWNER | SHYAM GUPTA AND NITI GUPTA. ADDRESS -10/402, SEAWOODS ESTATE, PHASE-01, NERUL WEST, NAVI MUMBAI. |
| NAME AND ADDRESS OF ARCHITECT | AR. AISHWARYA ANIL MANKAME (ARCHNEER) CONTACT NO.- 9769048388 |
| ORDER NUMBER AND DATE OFGRANT OF DEVELOPMENTPERMISSION | CERTIFICATE NO. :CIDCO/NAINA/PANVEL/WARDOLI/BP-00716/CC/2025/1217 DATED : 04 JUN 2025 |
| PERMITTED FLOOR SPACE INDEX(F.S.I) | ASSIGNED FSI AREA (AS PER RZ-2 LAYOUT APPROVAL) 389.150SQ.M |
| NUMBER OF RESIDENTIAL BANLOW UNITS WITH THEIR AREAS | PERMITTED HAVING NET BUILTUP AREA 409.302 SQ.M |
| ADDRESS WHERE COPIES OF DETAILED APPROVED PLANS SHALL BE AVAILABLE FOR INSPECTION | 10/402, SEAWOODS ESTATE, PHASE-01, NERUL WEST, NAVI MUMBAI. |
| NAME AND ADDRESS OF THE CONTRACTOR | SHRIGANESHA CONSTRUCTION SHOP NO. 1, SHREE SADAN, NEAR JUGAL KRUSHNA TEMPLE, CHIKHALE, PANVEL - 410 221 |


## नागोठण्यात मोफत आरोग्य शिबिराला प्रतिसाद

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे येथे मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. लोकप्रिय तरुण उद्योजक तथा नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य सुमित काते यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना नागोठणे शहर विभाग, आदर्श चॅरिटेबल ट्रस्ट, एम.पी.सी.टी. हॉस्पिटल (सानपाडा, नवी मुंबई) आणि यू.एम.सी. ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि. ५ मे रोजी सकाळी ९ ते दुपारी ५ वाजेपर्यंत नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.शिबिरात एकूण ५८ नागरिकांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.


### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक १३/२०२६-२०२७ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... अतिरिक्त पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील ई-१ लेआउटमधील २००० घनमीटर क्षमतेच्या संप व पंप हाऊसला स्टेनलेस स्टील (एसएस) रेलिंग पुरवणे व बसवणे आणि इतर किरकोळ कामे करणे. | ₹ ३६,६०,६३०.०० |
| २ | तळोजा औद्योगिक क्षेत्र..... रस्त्यांची देखभाल आणि दुरुस्ती... मुख्य सिमेंट कॉंक्रीट रस्ता आणि त्याला जोडणाऱ्या अंतर्गत रस्त्यांवरील स्पीड ब्रेकर्सची आयआरसी मार्गदर्शक तत्त्वांनुसार दुरुस्ती आणि पुनर्बांधणी करणे. | ₹ ३५,८०,९१८.०० |
| ३ | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल आणि दुरुस्ती... पाताळगंगा येथील जुन्या एचएसआरपर्यंत सेवा रस्त्यालगत रिटेनिंग वॉल आणि कर्ब वॉलचे बांधकाम करणे. | ₹ ३३,४८,५२८.०० |
| ४ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील अग्निशमन केंद्राची देखभाल व दुरुस्ती ... अग्निशमन केंद्राच्या आवारातील कार्यालय व कर्मचारी निवासस्थानांच्या इमारतींचे प्लिंथ संरक्षण करणे तसेच अग्निशमन केंद्राच्या आवारात पेव्हर ब्लॉक्स बसविणे. | ₹ ३९,८९,२८१.०० |
| ५ | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... धरणाच्या स्लॅबच्या वरच्या पृष्ठभागावर ३६ मिमी जाडीचे मॅस्टिक डांबर टाकणे. | ₹ २४,५०,५२५.०० |
| ६ | पाताळगंगा येथील नविन जलशुद्धीकरण केंद्र व सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती... पाताळगंगा येथील बुस्टर पंप हाऊस व सांडपाणी उदंचन केंद्रामधील सबमर्सिबल नॉन-क्लॉग पंपांची दुरुस्ती करणे. | ₹ १८,८२,०००.०० |
| ७ | पाताळगंगा येथील नविन व जुन्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... पाताळगंगा येथील शुद्ध व अशुद्ध जलउदंचन केंद्रामधील मोटर्सची एक वर्षाच्या कालावधीसाठी वार्षिक तत्वावर सर्व्हिसिंग व रिवाइंडिंग करणे. | ₹ ३८,३१,६२३.०० |
| ८ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती....... तळोजा फेज-२ पंपिंग स्टेशनवर टीसीएमयू सह २२ केव्ही एचटी पॅनलचा पुरवठा करणे. | ₹ ४०,१०,९९१.०० |
| ९ | रानसई पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.......रानसई जलशुद्धीकरण केंद्रातील आरएसजीएफच्या पाईप गॅलरी, तपासणी कक्षाची सुधारणा व मजबुतीकरण करणे व अनुषंगिक कामे करणे. | ₹ ३८,५२,२५३.०० |
| १० | नागोठाणे पाणीपुरवठा योजची देखभाल व दुरुस्ती.... डायलेक्ट्रिक उच्च शक्तीच्या संमिश्र सामग्रीचा पुरवठा करणे व बसविणे, तसेच अनुषंगिक कामे करणे. | ₹ ३९,४९,०९३.०० |

उपरोक्त कामांबाबतचे निविदा प्रपत्र दिनांक ०७/०५/२०२६ ते दिनांक २१/०५/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक ११/०५/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १३/०५/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

### जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेत येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका पेण पैकी गाव राठीचीवाडी येथील **श्री. जयराम कुंडाजी ठाकूर** यांचे मालकीची **गट क्रमांक व उपविभाग** २४/२ क्षेत्र ०–१६–०० **हे.आर.पॉ.** ही मिळकत ज्याच्या चतु:सीमा–

**पूर्वेला :– नाला**
**पश्चिमेला : फॉरेस्ट व गट नं. २४/२**
**दक्षिणेला :– गट नं. २४/२ ची उर्वरित मिळकत**
**उत्तरेला :– फॉरेस्ट**

आमचे अशिल **सौ. शिल्पा अमृत गोडबोले,** पनवेल, जिल्हा रायगड यांनी विकत घेण्याचे ठरविले आहे व त्याबाबत विद्यमान मालकांबरोबर बोलणी सुरू आहेत असे त्यांनी सांगितले आहे.

तरी, सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीनंतर आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

तारीख : ०६/०५/२०२६
**सही /–**
**ॲड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण**
कार्यालय : 'राधा–कुंज' ००४, तळ मजला, प्लॉट नं.११२, आर.डी.सी.सी. बँकेजवळ, एमसीसीएच सोसायटी, जुने पनवेल (रायगड)
ई–मेल – prathamesh.soman@gmail.com

**परिशिष्ट क्र. १६**
(उपविधी क्र. ३५ अन्वये)
**मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात / मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना**

### नोटीस

**सरकारी नोकर** सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता नवीन पनवेल या संस्थेचे सदस्य असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत/भूखंडावर/गाळा/ बंगला क्र................ ....धारण करणाऱ्या **श्रीमती निलजा दत्रात्रय कुलकर्णी** यांचे तारीख १३/०४/२०२५ रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मागणीदार / हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या / हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून **१५** दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या/ हरकती आल्या तर, त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस / हरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे दुपारी १२.०० वा. ते दुपारी ४.०० वा. पर्यंत, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

ठिकाण : नवीन पनवेल.
दिनांक : ०४/०५/२०२६
**सही/–**
**सचिव**
सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, नवीन पनवेल

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयामार्फत वाशी रेल्वेस्थानकात रक्तदान शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व मध्य रेल्वेच्या जगजीवनराम रुग्णालय, मुंबई यांच्या सहकार्याने वाशी रेल्वे स्थानक येथे मंगळवार ५ मे रोजी सकाळी १० वाजता रक्तदान शिबिराचे उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वी आयोजन करण्यात आले होते.



समाजाप्रति असलेली जबाबदारी आणि मानवतेची जाणीव लक्षात घेऊन या उपक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण ८० स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेतला. स्वयंसेवकांनी प्रवासी व स्थानिक नागरिकांमध्ये रक्तदानाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. रक्तदान हेच जीवनदान हा संदेश सर्वांपर्यंत पोहचवण्यात आला. शिबिरादरम्यान अनेक नागरिकांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण घालून दिले. रक्तदान करणाऱ्यांसाठी आवश्यक वैद्यकीय तपासणी, सुरक्षितता व योग्य मार्गदर्शनाची व्यवस्था करण्यात आली होती.

जगजीवनराम रुग्णालयाच्या वैद्यकीय पथकाने अत्यंत शिस्तबद्ध व दक्षतेने संपूर्ण प्रक्रिया पार पाडली. या उपक्रमामुळे गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होण्यासाठी मोठी मदत होणार असून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने हा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न ठरला आहे. स्वयंसेवकांमध्ये सेवाभाव, नेतृत्वगुण व सामाजिक जाणीव विकसित होण्यासही या शिबिरामुळे चालना मिळाली. सदर शिबिराच्या आयोजनामध्ये महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

सदर शिबिरास प्रा. प्रथमेश ठाकूर,सर्व विभाग प्रमुख व प्राध्यापक वर्ग तसेच महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांचे सहकार्य अत्यंत मोलाचे ठरले. यावेळी वाशी रेल्वे प्रशासन व जगजीवनराम रुग्णालयाच्या संपूर्ण टीमचेही विशेष आभार मानण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना युनिट पुढील काळातही अशा समाजोपयोगी, जनजागृतीपर व आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करून समाजसेवेची परंपरा कायम ठेवणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## दीड कोटींचा चोरीचा माल हस्तगत; तीन आरोपी गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील करंजाडे येथे सुरु असलेल्या रेल्वे पुलाच्या नवीन बांधणी संदर्भातील टाटा कंपनीचे ६७ टन स्टीलच्या पार्ट चोरीप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी तिघा जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून जवळपास दीड कोटी रुपयांचा चोरीचा माल हस्तगत केला आहे.

या ठिकाणी टाटा कंपनीचे रेल्वे पुल उभारण्याचे काम सुरु असून तेथील मॅनेजर बिजयकुमार वर्मा (४८ ) याने भंगारवाला आजीजूल अब्दुल रब रेहमान (४७ ) याच्याशी परवेज मोहम्मद अली आलव (२९) याच्या मध्यस्थीने संपर्क साधून तेथील साईटवरील



स्टीलचे पार्ट चोरण्यास मदत केली व जवळपास दीड कोटी रुपयांचा माल चोरून नेला होता. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक निवृत्ती शिंदे, पोहवा परेश म्हात्रे, संदेश म्हात्रे, अमोल पाटील, विनोद देशमुख आदींचे पथक तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या मदतीने शोध घेत असताना सदर माल चोरण्यासाठी जो हायड्रा वापरण्यात आला होता याची माहिती पोहवा परेश म्हात्रे यांना मिळाली.

त्यानुसार त्याला ताब्यात घेतले असता पुढील माहिती मिळून सदर माल हा धानसर येथे ठेवण्यात आल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोलिसांनी सदर ठिकाणी जाऊन जवळपास दीड कोटी रुपयांचा चोरीचा माल हस्तगत करून आरोपींना ताब्यात घेतले आहे.

# डम्परच्या धडकेत वकिलाचा मृत्यू

## खारघरमध्ये 'रास्ता रोको'



**पनवेल : वार्ताहर**

खारघर उपनगरात भरधाव डम्परने दुचाकीस्वार तरुण वकिलाला चाकाखाली चिरडल्याची धक्कादायक घटना सोमवारी सायंकाळी घडली. या अपघातानंतर संतप्त नागरिकांनी तातडीने रास्ता रोको करत आरोपीवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. काही तासांच्या आंदोलनानंतर पोलिसांनी जमावाची समजूत काढत वाहतूक सुरळीत केली.

सीबीडी बेलापूरकडून सेंट्रल पार्कच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर हा अपघात झाला. २८ वर्षीय महेश अशोक लोहार असे मृत वकिलाचे नाव असून ते खारघरच्या सेक्टर १२ परिसरात राहत होते. सोमवारी सायंकाळी ते आपल्या मित्रासोबत दुचाकीवरून घरी जात असताना राडारोडा वाहून नेणाऱ्या भरधाव डंपरने त्यांना डंपरच्या मागील चाकाखाली चिरडले. या भीषण अपघातात महेश यांच्या अंगावरून डंपर गेल्याने ते जागीच ठार झाले तर डंपरच्या धडकेत त्यांचा मित्र उडवला गेला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि मृताच्या नातेवाईक आणि मित्रमंडळींनी घटनास्थळी गर्दी करत तीव्र संताप व्यक्त केला. काही वेळातच त्यांनी रस्त्यावर ठिय्या देत रास्ता रोको सुरू केला. यामुळे खारघरमधील उत्सव चौक ते अग्निशमन दलापर्यंत वाहतूक ठप्प झाली आणि वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या.

घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी सहाय्यक पोलीस आयुक्त विक्रम कदम आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जोशी यांच्यासह वाहतूक शाखेचे अधिकारी व पोलीस दाखल झाले. त्यांनी संतप्त जमावाची समजूत काढत योग्य कारवाईचे आश्वासन दिले. पोलिसांनी या घटनेनंतर डम्परचालकाला ताब्यात घेतल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जोशी यांनी दिली.

# वाशिवली आदिवासीवाडीत मोफत आरोग्य शिबिर

**उरण : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील दुर्गम व आदिवासी भागात राहणाऱ्या आरोग्य सुविधांपासून वंचित असलेल्या नागरिकांसाठी वनवासी कल्याण आश्रम उरण व खालापूर तालुका, डिवाइन फाउंडेशन नवी मुंबई, एव्हलीन हेल्थकेअर मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने ४ मे रोजी मोफत सर्वसमावेशक आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. येथील वाशिवली आदिवासीवाडी येथे हे आरोग्य शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत चाललेल्या या शिबिरात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील एकूण ८२ रुग्णांनी तपासणीचा लाभ घेतला.

या शिबिरामध्ये नेत्रचिकित्सा, स्त्रीरोग, बालरोग तपासणीसह सर्वसाधारण आरोग्य तपासणी तसेच रक्ताशी संबंधित आजार असलेल्या सिकलसेल ॲनिमियाची तपासणी करण्यात आली. ग्रामीण व दुर्गम भागात सहसा उपलब्ध न होणाऱ्या महागड्या व



दर्जेदार तपासण्या मोफत उपलब्ध करून देण्यात आल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. डी. वाय. पाटील हॉस्पिटल समूहातील तज्ज्ञ डॉक्टरांनी या शिबिरात मोलाचे योगदान दिले. डॉ. सौरव जयस्वाल, अमीर मोहम्मद, काजळ साळुंखे, निमिषा चौधरी, जिगर मिस्त्री आणि डॅनियल कोकम यांनी रुग्णांची तपासणी करून योग्य सल्ला दिला.

सिकलसेल ॲनिमियासाठीच्या तपासण्या लॅब टेक्निशियन नरेश जगदाळे व सुमित जगदाळे यांनी केल्या. लक्ष्मी आय इन्स्टिट्यूटचे अश्विनी बोडके, अनिकेत जगताप यांच्या सहकार्याने नेत्र तपासण्या पार पडल्या. मोतीबिंदू असलेल्या रुग्णांना डॉ. हळदीपुरकर हॉस्पिटलमध्ये पुढील उपचारांसाठी नेण्यात आले. तपासणीनंतर आवश्यक औषधांचे मोफत वितरण करण्यात आले. या औषध वितरणासाठी पनवेल व उरण तालुक्यातील फार्मसिस्ट, मनोज ठाकूर, हरीश जगदाळे यांनी विशेष सहकार्य केले. या आरोग्य शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी एम. एस. डब्ल्यू चेतन चौरे डिवाइन फाउंडेशनचे हरीश जगदाळे, डी. एच. सुब्रमण्यम, तसेच एव्हलीन हेल्थकेअरचे संचालक सुमित जगदाळे यांचे मोलाचे योगदान लाभले.

वनवासी कल्याण आश्रमच्या मिरा पाटील,जयश्री वाघमारे, जयश्री घोडविंडे, वर्षा अधिकारी, ओम गोंधळी यांनी व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळली. दुर्गम भागात आरोग्य शिबिर आयोजित करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व संस्था, डॉक्टर, कर्मचारी व स्वयंसेवकांचे आभार वनवासी कल्याण आश्रमचे अध्यक्ष मनोज जगन्नाथ ठाकूर यांनी मानले. तसेच वाडीवरील १५ते १६ वयोगटातील मुलींना गर्भाशय मुखावरील कॅन्सरच्या लसीकरणासंदर्भात माहिती देऊन त्यांना जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात जाऊन घेण्याचे तसेच २४ मे रोजी दिल्ली येथे होणाऱ्या डी लिस्टिंग मोर्च्यात सामील होण्याचे आवाहन वाडीवरील जनजाती बांधवांना केले. समाजातील वंचित व दुर्बल घटकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्याचे कार्य रायगड जिल्ह्यातील आदिवासी पाड्यांवर ही समाजसेवा पुढेही सुरू राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



## नगरसेवक राजू सोनींच्या तत्परतेमुळे आग नियंत्रणात

**पनवेल : वार्ताहर**

नगरसेवक राजू सोनी यांच्या तत्परतेमुळे विद्युत मीटर व केबिनला लागलेली आग नियंत्रणात आली आहे. पनवेलमधील उरण नाका येथील गीतांजली टॉवरमधील विद्युत मीटर व केबिन जळाल्याने आग लागली होती. याची माहिती नगरसेवक राजू सोनी यांना काही नागरिकांनी फोनद्वारे कळवली. त्यांनी लगेच सहकारी मंदार देसाई यांना सांगून तातडीने पनवेल अग्निशमन दल यांना पाचारण करण्यास सांगितले. मंदार देसाई यांनी अग्निशामक दल फायर ब्रिगेडची गाडी बोलावून आग विझवली. त्यामुळे येथील व्यापारी व नागरिकांनी नगरसेवक राजू सोनी, मंदार देसाई तसेच पनवेल महानगरपालिका अग्निशमन दल कर्मचारी यांचे आभार मानले आहेत.

# सिलिंग कायद्याखालील वर्ग-२ जमीन वर्ग-१ करण्याचा मार्ग खुला

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने दिनांक ४ मे २०२६ रोजी महत्त्वाची अधिसूचना प्रसिद्ध करून महाराष्ट्र शेतजमीन जमीन धारणेची कमाल मर्यादा अधिनियम, १९६१ अंतर्गत कलम २७ नुसार वाटप झालेल्या भोगवटादार वर्ग-२ जमिनींचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरण करण्यासाठी नवे नियम जाहीर केले आहेत. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून वर्ग-२ धारणाधिकाराच्या बंधनात असलेल्या जमीनधारकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

शासनाने प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार ज्या जमिनी सिलिंग कायद्याखाली भोगवटादार वर्ग-२ धारणाधिकारावर प्रदान करण्यात आल्या आहेत, त्या जमिनी प्रदान झाल्यापासून १० वर्षे पूर्ण झाल्यानंतर आणि जमिनीच्या अटी-शर्तींचे उल्लंघन झालेले नसेल, किंवा उल्लंघन झाले असल्यास ते नियमाधीन करण्यात आले असेल, तर संबंधित जमीनधारकांना त्या जमिनीचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरण करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज करता येणार आहे.

या प्रक्रियेत जिल्हाधिकारी अर्ज प्राप्त झाल्यानंतर जमिनीचा तपशील, अटी-शर्तींचे पालन आणि संभाव्य उल्लंघन याची तपासणी करतील. अटींचे उल्लंघन नसल्यास किंवा उल्लंघन नियमित केलेले असल्यास, शासनाने ठरवलेल्या रूपांतरण अधिमूल्याच्या भरण्यानंतर जमीन वर्ग-२ मधून वर्ग-१ मध्ये रूपांतरित करण्याचा आदेश देता येणार आहे.

शासनाने रूपांतरणासाठी वार्षिक दर विवरणपत्र/रेडी रेकनर मूल्याच्या आधारे अधिमूल्य निश्चित केले आहे. महानगर प्रदेश, महानगरपालिका, नगर परिषद व त्यांच्या सीमान्त क्षेत्रांमध्ये अशा जमिनींसाठी ३० टक्के अधिमूल्य, तर इतर क्षेत्रांत २५ टक्के अधिमूल्य निश्चित करण्यात आले आहे. ज्या जमिनी पूर्वपरवानगीने हस्तांतरित झालेल्या आहेत किंवा ज्यांचा वापर बदललेला आहे, अशा प्रकरणांमध्ये क्षेत्र व वापरानुसार २० टक्के ते ३० टक्के अधिमूल्य लागू राहणार आहे.

या अधिसूचनेत ₹५० लाखांची महत्त्वाची मर्यादादेखील निश्चित करण्यात आली आहे. रेडी रेकनरनुसार जमिनीचे बाजारमूल्य ₹५० लाखांपर्यंत असल्यास जिल्हाधिकारी स्वतः रूपांतरणाचा आदेश देऊ शकतील. मात्र, जमिनीचे बाजारमूल्य ₹५० लाखांपेक्षा जास्त असल्यास राज्य शासनाची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. मराठी बांधकाम व्यावसायिक महासंघाचे महासचिव प्रकाश बाविस्कर यांनी माहिती दिली की, महाराष्ट्र शासनाने सिलिंग कायद्याखालील वर्ग-२ जमिनी वर्ग-१ करण्याचा मार्ग स्पष्ट केल्यामुळे हजारो जमीनधारकांना मोठा दिलासा मिळणार आहे. अनेक वर्षांपासून अशा जमिनींवर निर्बंध असल्यामुळे जमीनधारकांना विकास, व्यवहार, कर्ज, गुंतवणूक आणि मालमत्तेच्या योग्य वापरात अडचणी येत होत्या. आता शासनाने नियम, मुदत, अधिमूल्य आणि प्रक्रिया स्पष्ट केल्याने जमीन व्यवहारात पारदर्शकता वाढेल. हा निर्णय जमीनधारक, शेतकरी, गुंतवणूकदार आणि विकास क्षेत्रासाठी सकारात्मक आहे.

ते म्हणाले की, राज्य शासनाने अशा धोरणात्मक निर्णयांद्वारे जमिनीवरील अनावश्यक अडथळे कमी करून विकासाला चालना देणे आवश्यक आहे. वर्ग-२ जमीन वर्ग-१ झाल्यास मालकी हक्क अधिक सक्षम होईल, जमिनींचा आर्थिक उपयोग वाढेल आणि ग्रामीण तसेच शहरी सीमान्त भागातील विकास प्रक्रियेला गती मिळेल. मात्र ही प्रक्रिया पारदर्शक, वेळेत आणि शक्यतो ऑनलाइन पद्धतीने राबवली गेल्यास त्याचा खरा लाभ सामान्य जमीनधारकांपर्यंत पोहचेल.

## विवाहिता बेपत्ता

**पनवेल : वार्ताहर**

कोणास काही एक न सांगता एक विवाहिता कोठेतरी निघून गेली आहे. त्यामुळे ती हरविल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

सदर महिलेचे नाव स्वरा स्वराज गुरव (३०), उंची ५ फुट ३ इंच, रंग गोरा व अंगावर पांढरे डाग, अंगाने सडपातळ, चेहरा उभट, डोळे काळे, नाक सरळ, केस काळे लांब, अंगात काळ्या रंगाचा टी-शर्ट व पायात निळ्या रंगाची ट्रक, पायात काळ्या रंगाचे शूज, भाषा मराठी, हिंदी बोलते, सोबत मोबाईल फोन आहे.

या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाणे किंवा पोहवा निलेश घरत यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांमार्फत करण्यात आले आहे.

## चिरनेरमध्ये 'अंगारक'निमित्त गणेशभक्तांच्या गर्दीचा उच्चांक




**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर महागणपती क्षेत्रात अंगारकी संकष्टी चतुर्थी निमित्ताने उन्हाची तमा न बाळगता अगदी पहाटेपासूनच भाविकांनी प्राचीन जागृत श्री महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला. पहाटे चार वाजल्यापासून गणेशभक्तांच्या दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले होते. प्रथमतः श्री महागणपतीची महापूजा करण्यात आली. त्यानंतर गणेशभक्तांनी श्रींच्या दर्शनाला सुरुवात केली. दुपारी गर्दीचे प्रमाण थोडेसे कमी झाले होते.

सकाळी आणि संध्याकाळी गणेशभक्तांनी गणेश मंदिर गाठून श्रींचे दर्शन घेतले. पेशवेकालीन मंदिरात प्राचीन श्री महागणपतीची मूर्ती विराजमान आहे. दिवसभर श्री महागणपतीच्या मंदिरात भजनांचा सूर ऐकायला मिळाला. मंगळवारी अंगारकी चतुर्थीचा योग आल्याने भाविकांच्या गर्दीचा उच्चांक पाहायला मिळाला. संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने हार, गावठी भाज्या, वाल, चवळी, रानटी कंदमुळे, स्थानिक कुंभारांनी बनविलेली मातीची भांडी तसेच अन्य पदार्थांच्या विक्रीला ग्राहकांनी पसंती दर्शवल्याचे दिसत होते.

चिरनेर परिसरातील अनेक रहिवाशांना दर महिन्याच्या संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने रोजगार मिळत आहे. नेहमीप्रमाणे उरण, पनवेल, पेण, नवी मुंबई येथील भाविकांनी श्रींच्या दर्शनाचा लाभ घेतला. सहा महिन्यांतून एकदा येणारी अंगारकी चतुर्थी असल्याने भाविकांनी महागणपतीच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी सकाळपासूनच गर्दी केली होती. दिवसभरात भाविकांच्या प्रचंड गर्दीने उच्चांक गाठला होता.

## सव्वा लाखाचा गुटखा जप्त



**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली पोलिसांनी एका घरावर छापा मारून जवळपास सव्वा लाखाचा गुटखा साठा जप्त केला आहे. कळंबोलीतील दत्त अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन मधील घरावर छापा मारुन सदर घरामध्ये साठवून ठेवलेला १ लाख १२ हजार ५०० रुपयांचा प्रतिबंधित तंबाखू आणि गुटखा पोलिसांनी हस्तगत केला आहे.


यावेळी सदर गुटख्याचा साठा करुन ठेवणारा आरोपी पळून गेला असून कळंबोली पोलिसांनी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे. कळंबोलीतील दत्त अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन मधील बिल्डींग नंबर-१६ मधील रुम नंबर ४ मध्ये गुटख्याचा साठा लपून ठेवण्यात आल्याची माहिती कळंबोली पोलिसांना मिळाली होती. याआधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने छापा टाकला. छापा टाकण्यापूर्वीच गुटख्याचा साठा करुन ठेवणारा आरोपी गोलू राजपूत याने पलायन केले. त्यानंतर पोलिसांनी सदर घराची झडती घेऊन १ लाख ८ हजार रुपये किंमतीच्या राज कोल्हापुरी गुटख्याच्या १० गोण्या, तसेच ४५०० रुपये किंमतीची तुलसी सुगंधी तंबाखुची २० पाकिटे असा एकूण १.१२ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी गोलू राजपूत याच्या विरोधात अन्न सुरक्षा मानदे कायदा तसेच भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नवी मुंबई महापालिका लोकशाही दिन १ जूनला

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. या अनुषंगाने ४ मे रोजी आयोजित करण्यात आलेल्या लोकशाही दिनात प्राप्त अर्जांबाबत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी अतिक्रमण विभागाला कार्यवाहीचे आदेश दिले. जून महिन्याचा लोकशाही दिन १ जून रोजी होणार असून अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज दोन प्रतींमध्ये १८ मेपर्यंत मा. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे नावे लोकशाही दिनाकरीता अर्ज असे दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन सादर करावयाचा आहे.

लोकशाही दिनाकरीता करावयाच्या अर्जाचा विहित नमुना नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in या संकेतस्थळाच्या मुख्यपृष्ठावर जलद दुवे आयकॉनवर उपलब्ध असून तेथून अर्ज नमुना प्रत सहजपणे डाऊनलोड करुन घेता येऊ शकते. त्याचप्रमाणे महानगरपालिका नूतन मुख्यालय इमारत, जनसंपर्क विभाग, तिसरा मजला, से.१५ ए, किल्ले गावठाणजवळ, सी.बी.डी., बेलापूर येथेही प्रत नागरिकांसाठी विनामूल्य उपलब्ध आहे.



अर्ज करताना नागरिकांनी शासन निर्णयानुसार अर्जात नमूद तक्रार/निवेदन हे वैयक्तिक स्वरुपाचे असावे याची दखल घ्यावयाची आहे. अर्ज एकाच विभागाशी संबंधित एकाच विषयाबाबत असावा. अर्जदाराने संबंधित विषयाबाबत या आधी विभाग कार्यालय, विभागप्रमुख स्तरावर निवेदन सादर केलेले असावे. याशिवाय लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/अपिल, सेवाविषयक आस्थापना विषयक बाबी याबाबतचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावयाची आहे.

विहित नमुन्यात नसणारे व अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच तक्रार/निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे नसेल तर तसेच यापूर्वीच अंतिम उत्तर दिलेले आहे/देण्यात येणार आहे अशा प्रकरणी पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्जही स्वीकारले जाणार नाहीत याची नागरिकांनी नोंद घ्यावी, असे सूचित करण्यात आले आहे.

# भाजपच्या विजयाचा खोपोलीत जल्लोष

**खोपोली : प्रतिनिधी**



बंगालमध्ये प्रथमतः भारतीय जनता पक्षाला विधानसभेच्या निवडणुकीत घवघवीत यश प्राप्त झाल्याच्या पार्श्वभूमीवर खोपोलीत भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करीत व लाडू वाटप करीत जल्लोष साजरा केला. यावेळी फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली

शहर मध्यवर्ती कार्यालयासमोर सायंकाळी भारतीय जनता पक्षाच्या विजयाच्या तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जय जयकाराच्या प्रचंड घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. पक्षाचे युवा नेते तथा उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, खोपोली शहर महिला मोर्चा अध्यक्ष आणि नगरसेविका अश्विनीताई अत्रे, युवा मोर्चाचे विनायक माडपे, विकास खुरपडे, हिम्मत मोरे, अपर्णा साठे, स्नेहल सावंत, विभावरी पाठक, सुमती महर्षी, सुप्रिया नांदे, भारती शाह, श्रुती चौधरी, पियुष महर्षी, प्रल्हाद अत्रे, धनश्री अत्रे, निरंजन राजपूत, सुभाष सावंत, अमन खाला आदींसह अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**महाड :** श्री काळभैरी आईच्या असीम कृपेने आणि श्री गणरायाच्या आशीर्वादाने महाड तालुक्यातील कुसगाव येथे नवीन बांधण्यात आलेल्या काळभैरी मंदिराचा भव्य जीर्णोद्धार व प्राणप्रतिष्ठापना सोहळा अत्यंत उत्साही आणि भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. श्रद्धेचा जागर आणि परंपरेचा सन्मान राखत पार पडलेल्या या सोहळ्याला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमात विधिवत पद्धतीने मूर्ती प्राणप्रतिष्ठापना अशा धार्मिक विधींमुळे सर्वत्र भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. हा सोहळा म्हणजे केवळ एका वास्तूचे उद्घाटन नसून आपल्या सांस्कृतिक एकतेचे आणि परंपरेचे दर्शन घडवणारा एक अविस्मरणीय उत्सव ठरला. यावेळी मंत्री भरत गोगावले, पंचायत समिती सदस्य रेणुका देशमुख, नूतन मोरे, इमरान पठाण, सर्व ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, विभागातील शिवसेनेचे पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.





**माणगाव :** भांदरे येथे श्री हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार व कलशारोहण सोहळा मंत्री भरत गोगावले यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. गावातील श्री हनुमान मंदिर माझ्या निधीतून उभारण्यात आले असून गावामध्ये विविध विकासकामेदेखील करण्यात आली आहेत. येणाऱ्या काळातही गावाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहू, अशी ग्वाही देत त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला तसेच ग्रामस्थांनी मांडलेल्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. यावेळी जि.प.सदस्य दिनेश हरवंडकर, पंचायत समिती सदस्य रवी टेंबे, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष प्रमोद घोसाळकर, महिला संघटिका वाघमारे ताई, विभागातील शिवसेनेचे पदाधिकारी, सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मिसिंग लिंकवर सेल्फीला दंड आकारणीस सुरुवात



**खोपोली : प्रतिनिधी**

गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झालेल्या मिसिंग लिंकवर सेल्फीसाठी थांबणाऱ्या वाहनांवर वाहतूक पोलिसांनी दंड आकारणी सुरुवात केली आहे. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंक महाराष्ट्र दिनी उद्घाटन झाल्यानंतर कार तसेच बस यासारख्या वाहनांना परवानगी देण्यात आली आहे. मिसिंग लिंकवरुन प्रवास करताना प्रवासी काही क्षण पुलावर थांबून फोटो, सेल्फी काढत असल्याने वाहतूक पोलिसांनी दंड आकारणी करण्यास सुरुवात केली आहे. विशेष म्हणजे उद्घाटनाच्या पहिल्याच दिवशी पोलिसांची नजर चुकवून रसायनाची वाहतूक करणारा टँकर मिसिंग लिंकवरून प्रवास करताना आढळून आला होता.

## अभिनव विद्यालयात सार्थ हगवणे बारावीच्या परीक्षेमध्ये प्रथम

**कर्जत : प्रतिनिधी**

बारावी परीक्षेचा निकाल नुकताच लागला असून अभिनव ज्ञान मंदिर कनिष्ठ महाविद्यालयात कु. सार्थ सुनील हगवणे याने ९०.५० टक्के गुण मिळवत सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळविला. कु. वैष्णवी अशोक करणूक ८८.१७ टक्के गुण मिळवून मुलींमध्ये प्रथम आली आहे. तर निधी सुयोग फडके ८७.८३ टक्के गुण मिळवून मुलींमध्ये दुसरी आली आहे. हे तीनही विद्यार्थी वाणिज्य शाखेतील आहेत.

विज्ञान शाखा : प्रथम : कु. सलोनी धर्मेश पेरणेकर (८४.३३), द्वितीय : कु. सानिया प्रमोद देशमुख (७६.८३), तृतीय : कु. सोनिया बाळकृष्ण घारे (७६.५०), कला शाखा : प्रथम कु. सायली संपत नांगरे (८५.५०), द्वितीय : कु. साना इस्तीयाक शेख (८०.१७), तृतीय : कु. प्रेम महादू डोके (७९.३३).

## श्रेयस वारगेचे कला शाखेत धवल यश

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील मुरुड शहरातील नामांकित सर एस. ए. हायस्कूल व स्व. म. ल. दांडेकर कनिष्ठ महाविद्यालयामध्ये कला शाखेत शिकणारा श्रेयस श्रीकांत वारगे याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्याने अभ्यासात कठोर परिश्रम घेऊन ७०.०५% गुण मिळून मुरुड तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. शीघ्रे ग्रामपंचायत हद्दीमध्ये राहणारे श्रीकांत वारगे हे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असणारे व्यक्तिमत्व असून श्रेयस हा त्यांचा मुलगा आहे.

ग्रामीण भागात कोणतीही सुविधा प्राप्त नसताना स्वबळाच्या अभ्यासाने त्याने हे धवल यश प्राप्त केले आहे. इशा कृष्णा कासारे ६८.३३% हिला गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला आहे. शुभम गायकरने ५६.८३% मिळवत तृतीय क्रमांक मिळवला.

## मुख्याध्यापिका अकिला दळवी यांचा सेवानिवृत्ती गौरव सोहळा

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**



माणगाव तालुक्यातील साई रायगड जिल्हा परिषद शाळा साई येथे तीन वर्षे मुख्याध्यापिका म्हणून सेवा बजवलेल्या अकिला बानू शहानवाज दळवी या ३७ वर्षे शिक्षक सेवेतून सेवानिवृत्त झाल्या.०३०३/१९८९ पासून त्या सेवेत रुजू झाल्यापासून त्यांचे दासगाव ते नाईटने, साई या परिसरात शिक्षक सेवेत त्यांनी स्वतःला झोकून देत सेवा केली. मुस्लिमधर्मीय असून मराठी भाषेतून शिक्षण घेऊन त्यांनी मराठी भाषेत प्रभुत्व गाजवत मराठी शाळेवर त्या मुख्याध्यापिकापदावर कार्यरत असताना साई रा. जि. प. शाळेतून त्या सेवानिवृत्त झाल्या.

या कार्यक्रमप्रसंगी साई ग्रामपंचायतीच्या सरपंच हवाबी राहटविलकर, उपसरपंच आफ्रिन राऊत, ग्रामसेवक स्वप्निल अवचित्य, साई लोकमान्य ज्ञानदीप हायस्कूलचे संस्था अध्यक्ष गजानन अधिकारी, केंद्रप्रमुख राजू पवार, शहानवाज दळवी सर तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी गजानन अधिकारी यांनी अकिला बानू दळवी यांनी आपल्या सेवेत साई रा. जि. प.शाळेतील अनेक कामांची पोचपावती उपस्थितांना सांगितली. त्यांची मुलगी डॉ. फराह शहानवाज दळवी तसेच मुलगा (सीनियर इंजिनियर) मेहमूद शहानवाज दळवी यांनी आपल्या आईने आम्हाला चांगल्या प्रकारे उच्च शिक्षण देत चांगल्या पदावर नोकरी करण्याचा सन्मान दिला, असे मत मांडले.

सदर कार्यक्रमप्रसंगी साई लोकमान्य विद्यामंदिर हायस्कूलच्या मुख्याध्यापिका म्हात्रे मॅडम आणि हायस्कूलचे सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी, भोईर सर, चव्हाण सर, चांदोरे हायस्कूलचे कासारे सर, विविध क्षेत्रातील मान्यवर, आप्तेष्ट नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माणगाव येथील श्रीमती सविता नीलकंठ सावंत कॉमर्स कॉलेजचा बारावी परीक्षेचा निकाल ९०%

**माणगाव : प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळातर्फे फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा निकाल शनिवार दि.२ मे २०२६ रोजी ऑनलाईन जाहीर झाला. या बारावी परीक्षेत माणगाव येथील जे.बी. सावंत एजुकेशन सोसायटी संचालित श्रीमती सविता नीलकंठ सावंत कॉमर्स कॉलेजने आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवीत या कॉलेजचा वाणिज्य शाखेचा बारावी परीक्षेचा निकाल ९० % इतका लागला असून कु.जान्हवी मंगेश तुरडे या विद्यार्थिनीने ६३ % इतके गुण संपादन करून महाविद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान पटकाविला.

या कॉलेजमधून कु.रुद्राणी अनिल दामुगडे या विद्यार्थिनीने ६१.५० % गुण द्वितीय क्रमांक तर कु. कार्तिक शशिकांत दाखिणकर या विद्यार्थ्याने ५९.१७ % गुण तृतीय क्रमांक पटकावला आहे. या महाविद्यालयातून यंदा बारावी परीक्षेसाठी एकूण ४० विद्यार्थी बसले होते त्यापैकी ३६ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन महाविद्यालयाचा निकाल ९० % लागला. या महाविद्यालयाचा निकाल चांगला लागल्याने पालक वर्ग व विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे सेक्रेटरी नानासाहेब सावंत,अध्यक्ष अण्णासाहेब सावंत, विश्वस्त भाऊसाहेब सावंत, महाविद्यालयीन विकास समितीचे सदस्य रामदास पुराणिक, प्रभारी प्राचार्या डॉ. अमृता देशमुख,सर्व शिक्षक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारीवृंद यांनी विशेष अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## पौर्णिमेच्या प्रकाशात पर्यटकांनी घेतला फणसाड अभयारण्यातील वन्यजीव गणनेचा आनंद; निसर्गप्रेमी संघटनांचे लाभले सहकार्य

**मुरुड : प्रतिनिधी**




बुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने फणसाड वन्यजीव अभयारण्यात नागरिकांच्या मार्फत पाणवठ्या वरील वन्यजीव गणना करण्यात आली. सदरच्या निसर्ग अनुभव कार्यक्रमांमध्ये एकूण २६ पर्यटक सहभागी झाले. सर्व सहभागी पुणे मुंबई मुरुड रोहा अलिबाग असे विविध ठिकाणावरून आले होते. सव्विस पर्यटक तसेच फणसाड अभयारण्यातील वनरक्षक, वनमजूर यांनी मिळून ८ मचाणीवर रात्रभर बसून वन्यजीव पाहणी केली. त्यामध्ये धरणाची गान, बांधतलाव केतकीची गान, चिखलगान भांडव्याचा माळ, चाक्याचा माळ, आंबेगान आणि विहुर धरण या ठिकाणी असलेल्या मचाण वर बसून नागरिकांनी मनसोक्त निसर्ग अनुभव घेतला.

रात्रभर पौर्णिमेच्या प्रकाशात पर्यटकांना विविध प्राणी पक्षी ह्यांचे दर्शन झाले. त्यामध्ये सहकुटुंब सहभागी असलेले अनिल कुदळे ह्यांना बिबट्याचे दर्शन झाले. बांधतलावावर पर्यटकांना साळिंदर दिसले तर केतकीची गान येथील पर्यटक सकाळी बेस कॅम्प सुपेगांव परत येत असताना महाराष्ट्राचा राज्य प्राणी शेकरू बघायला मिळाला. सोबतच पर्यटकांना भेकर,पांढरा उंदीर,रानडुक्कर, दिवड साप, चापडा साप, मश्या दिवड असे विविध प्राणी दिसले.


सांबर ९, भेकर ३, रानडुक्कर ११, बिबटे ३, शेकरू १३, ससा ९, रानगवे ६, रानमांजर १, साळींदर ३, मुंगूस ३, माकडे ३३, वानर ३१, रानकोंबडे ११, मोर ९, गिधाड २१, ब्राह्मी घार ३ अशी प्राण्यांची गणना अंदाजे करण्यात आली.

पक्ष्यांमध्ये राखी, धनेश, तांबट समुद्र गरुड, शिपाई बुलबुल, कवडा, सनबर्ड मोर, पानकावडा, श्यामा जंगली पिंगळा, मलबार धनेश, हळद्या दयाळ, मोठा तांबट, मच्छी घुबड रातवा, रान कोंबडा, शामा भारद्वाज, हरियाल अशा विविध पक्ष्यांचे दर्शन पर्यटकांना झाले. फणसाड वन परिक्षेत्र अधिकारी नितीन ढगे, वनपाल आदेश पोकळ, वनपाल हरिश्चंद्र नाईक यांनी रात्रभर निसर्ग अनुभव कार्यक्रमाचे व्यवस्थापन केले.

अनिल कुदळे यांनी मनोगत व्यक्त केले. एक अनोखा अनुभव पर्यटकांना मिळण्याची उत्तम संधी आहे. पौर्णिमेच्या रात्री जंगलातील आवाज ऐकणे अविस्मरीय अनुभव असल्याचे त्यांनी सांगितले. फणसाड अभयारण्यातील वनसेवक प्रदीप बागवे ह्यांनी दिलेली माहिती ऐकून पुन्हा फणसाडमध्ये फिरायला येण्याचे अनिल कुदळे यांनी सांगितले.

## रेवदंड्यातील माय-दे-देउस उत्सव यात्रा उत्साहात





**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा येथील ऐतिहासिक वारसा जपणारी पोर्तुगीजकालीन माय-दे-देउस उत्सव यात्रा यंदाही मोठ्या उत्साहात संपन्न झाली आहे. या उत्सवानिमित्त मुरुड तालुक्यातील कोर्लई तसेच महाराष्ट्रभर विखुरलेल्या ख्रिस्ती बांधव-भगिनींची लक्षणीय उपस्थिती येथे अनुभवायला मिळाली.

रेवदंडा गोळा स्टॉपजवळ कोर्लई परिसरातील ख्रिस्ती बांधवांचे श्रद्धास्थान असलेले प्राचीन माय-दे-देउस मंदिर आहे. या मंदिरात दरवर्षी ५ मे रोजीच उत्सव यात्रा भरविण्याची परंपरा आहे. यंदाही मोठ्या भक्तिभावाने आणि पारंपरिक पद्धतीने हा सोहळा साजरा करण्यात आला.

दरम्यान, गेल्या महिनाभरापासून कोर्लई येथून अनेक भाविक पायी चालत रेवदंडा येथे येऊन पूजा-अर्चा करीत होते. उत्सवाच्या दिवशी सकाळी सुमारे ९ वाजता पूजा, प्रार्थना आणि आरतीचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर पारंपरिक रितीरिवाजांनुसार माय-दे-देउस मातेची पालखी रेवदंडा बाजारपेठेतून काढण्यात आली होती. विठोबा आळी मार्गे निघालेला हा पालखी सोहळा पुन्हा मंदिरात परतला. अत्यंत शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात पार पडलेला हा सोहळा भाविकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.

यानंतर मंदिर प्रांगणात कोर्लई चर्चचे फादर यांच्या मार्गदर्शनाखाली सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. विविध सामाजिक व धार्मिक कार्यात योगदान देणाऱ्या ख्रिस्ती बांधवांचा यावेळी गौरव करण्यात आला. उत्सवानिमित्त मंदिराचे आकर्षक सुशोभीकरण करण्यात आले होते. मोठ्या धार्मिक वातावरणात आणि उत्साहात पार पडलेली ही माय-दे-देउस यात्रा रेवदंडा परिसरातील एक महत्त्वपूर्ण सांस्कृतिक परंपरा असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

## जितेंद्र म्हात्रे यांची पोलीस उपनिरीक्षक, तर राजेश म्हात्रे यांची सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदावर बढती

**पेण : प्रतिनिधी**



अलिबाग तालुक्यातील आवास गावातील जितेंद्र विठ्ठल म्हात्रे यांची रायगड पोलीस दलात पोलीस उपनिरीक्षक (PSI) पदावर पदोन्नती झालेली आहे. सध्या ते पेण पोलीस स्टेशन येथे कर्तव्यात आहेत. तसेच राजेश अनंत म्हात्रे यांची सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती झालेली आहे. सध्या ते महामार्ग पोलीस मदत केंद्र वाकण येथे कर्तव्यात आहेत. दोघांनीही पोलीस खात्यात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालक पदक मिळवलेले आहेत. पदक मिळवल्याबद्दल ग्रुप ग्रामपंचायत आवास सरपंच अभिलाषा अभिजित राणे, उपसरपंच, सर्व सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी सर्व कर्मचारी व ग्रामस्थ आवास, सुरेखार, टेकाळी, इंद्रपै व रांजणपाडा आणि पंचक्रोशीतील नागरिकांकडून सर्वत्र कौतुक होत आहे.

## पेण एज्युकेशन सोसायटीच्या प्रायव्हेट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजची बारावीच्या परीक्षेत चमक

**पेण : प्रतिनिधी**

पेण एज्युकेशन सोसायटीच्या प्रायव्हेट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचा इयत्ता बारावीचा निकाल यंदा अत्यंत उल्लेखनीय लागला असून सर्वच शाखांमध्ये विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

महाविद्यालयाच्या सायन्स शाखेचा निकाल तब्बल ९९.१४ टक्के, कॉमर्स शाखेचा ९७.७६ टक्के तर आर्ट्स शाखेचा ८२.५५ टक्के इतका लागला असून एकूण पेण एज्युकेशन सोसायटीचा प्रायव्हेट हायस्कूल ज्युनिअर कॉलेजचा इयत्ता बारावीचा निकाल यंदा ९४.३१ % निकाल लागला आहे.

शाळेतील सायन्स शाखेतील प्रथम क्रमांक दिशा टेमघरे ९०.१७% तर द्रितीय क्रमांक केदार तुपे ८९.३३%, तृतीय क्रमांक शुभांग देव ८८.५०%, चतुर्थ क्रमांक श्रमण गायकवाड ८५.१७%, पाचवा क्रमांक ज्ञानदा वेखंडे ८३% हिचा लागला आहे. तर कॉमर्स शाखेचा प्रथम क्रमांक मो.फैज मो.फैयाज खान ९३.१७ % द्वितीय क्रमांक अक्षर चेतन पंड्या ९१.९३ % तृतीय क्रमांक रिया संदीप चव्हाण ८९.८३% चतुर्थ क्रमांक श्रद्धा जगदीश गावंड व सावनी सुभाष पेंडसे यांना ८९.३३ % तर पाचवा क्रमांक श्रावणी अमित कवळे ८९.१७ % मिळाले आहेत.

# मुंबईचा विक्रमी विजय; लखनऊ पराभूत

**मुंबई : प्रतिनिधी**

रोहित शर्मा आणि रायन रिकल्टन जोडीच्या सुपर हिट शोच्या जोरावर मुंबई इंडियन्सच्या संघाने लखनऊ सुपर जाएंट्सने दिलेल्या विक्रमी धावांचा यशस्वी पाठलाग करत नवा इतिहास रचला आहे. पूरनच्या वादळी अर्धशतकाच्या जोरावर लखनऊच्या संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना २२८ धावा करत मुंबई इंडियन्ससमोर २२९ धावांचे टार्गेट सेट केले होते. आयपीएलच्या आतापर्यंतच्या इतिहासात मुंबई इंडियन्सच्या संघाने एवढ्या मोठ्या धावसंख्येचा पाठलाग यशस्वीपणे केला.



दुखापतीमुळे पाच सामन्याला मुकलेल्या हिटमॅन रोहित शर्माचे दमदार कमबॅक आणि रायन रिकल्टनने कामगिरीतील सातत्य दाखवून देत मुंबई इंडियन्सने आयपीएल इतिहासातील आपल्या सर्वात मोठ्या धावसंख्येचा यशस्वी पाठलाग अगदी सहज साध्य केला. दुसरीकडे या सामन्यातील पराभवासह मुंबई इंडियन्सपाठोपाठ आता लखनऊच्या संघाचीही स्वबळावर प्लेऑफ तिकीट मिळवण्याची आशा संपुष्टात आली आहे. दोन्ही संघ गुणतालिकेत तळाला असून उर्वरित सर्व सामने जिंकले तरी मुंबई इंडियन्स आणि लखनऊ दोन्ही संघ १४ गुणांपर्यंतच पोहचू शकतात.

निकोलस पूरनच्या २१ चेंडूतील ६३ धावांच्या धमाकेदार खेळीशिवाय मिचेल मार्श ४४ (२५), एडन मार्करम ३१ (२५) आणि हिम्मत सिंग ४० (३१) यांनी दिलेल्या योगदानाच्या जोरावर लखनऊच्या संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना निर्धारित २० षटकात पाच विकेट्सच्या मोबदल्यात २२८ धावा केल्या होत्या. मुंबई इंडियन्सकडून क़र्बिन बॉशने सर्वाधिक दोन, तर अल्लाह गझनफर, विल जॅक्स आणि रघु शर्मा यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

विक्रमी धावसंख्येचा पाठलाग करताना रोहित शर्मा आणि रायन रिकल्टन जोडीने संघाला दमदार सुरुवात करुन दिली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी १४३ धावांची भागीदारी रचली. रायन रिकल्टन ३२ चेंडूत सहा चौकार आणि आठ षटकाराच्या मदतीने ८३ धावा केल्या. दुखापतीतून सावरून परतलेल्या रोहित शर्माने ४४ चेंडूत सहा चौकार आणि सात षटकारांच्या मदतीने ८४ धावांची धमाकेदार खेळी केली. तिलक वर्मा १३ चेंडूत ११ आणि सूर्यकुमार यादव सात चेंडूत १२ धावांची भर घालून परतल्यावर नमन धीर २३ (१२) आणि विल जॅक्स १० (४) जोडीने १९व्या षटकातील चौथ्या चेंडूवर संघाचा विजय निश्चित केला.



## ज्युनियर महाराष्ट्र, महाराष्ट्र श्री स्पर्धा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशनच्या सौजन्याने नुकतीच राज्यस्तरीय उंची गटाची शरीरसौष्ठव स्पर्धा पार पडली. स्पर्धेचे उद्घाटन राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते झाले.

ॲमेचुअर बॉडी बिल्डिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र या संघटनेच्या मान्यतेने आणि नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशनचे सेक्रेटरी डॉ. विजय पाटील यांच्या आयोजनाखाली झालेल्या या स्पर्धेसाठी असोसिएशनचे उपाध्यक्ष विजय पाटील, चेअरमन दत्तू पाटील (हेल्थ क्लब), खजिनदार संजय निकम आणि सर्व सहकारी यांचे सहकार्य लाभले.

स्पर्धेवेळी हौशी संघटनेच्या माध्यमातून मुंबई, नवी मुंबई, ठाणे, उपनगर येथे कार्यरत असलेल्या सेवाभावी कार्यकर्ते, पंच यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये नंदकुमार तावडे (मुंबई), अरुण कुरळे (मुंबई), प्रवीण खामकर (मुंबई), शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त प्रशांत नारकर (मुंबई), सुरेंद्र महाडिक (नवी मुंबई), हेमंत पाटील (उपनगर मुंबई), गिरीश शेट्टी (ठाणे) आदींचा समावेश आहे.

या स्पर्धेसाठी मुंबई, मुंबई उपनगर, नवी मुंबई, रायगड, कोल्हापूर,बीड आधी जिल्ह्यातील व्यायामपटू आलेले होते.

पंच म्हणून राजन उतेकर, सुनील हिर्लेकर, राजेंद्र गुरव, सुरेंद्र महाडिक, नंदकुमार तावडे, तर स्कोरर म्हणून निखिल पाटकर, जितेंद्र आळेकर, किसन धावडे इत्यादींनी कामकाज पाहिले.

**गटनिहाय किताब विजेते**

ज्युनि. महाराष्ट्र श्री २०२६ : सोहम संजय धामणकर (मुंबई)

महाराष्ट्र मेन्स फिटनेस २०२६ : ईश्वर प्रदीप ढोलम (मुंबई उपनगर)


महाराष्ट्र मास्टर श्री २०२६ (४०/५० वर्षावरील) : संतोष अशोक बंगेरा, मुंबई

महाराष्ट्र श्री २०२६ : अजय गणपत कदू (मुंबई).

## निकोलस पूरनने वैभव सूर्यवंशीचा रेकॉर्ड मोडला

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वानखेडेच्या मैदानातील मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात अखेर लखनौ सुपर जाएंट्सचा महागडा फलंदाज निकोलस पूरनची बॅट तळपली. तिसऱ्या क्रमांकावर बढती मिळाल्यावर षटकारांची अक्षरश: बरसात करत त्याने अवघ्या १६ चेंडूत अर्धशतक साजरे केले. बढती मिळताच त्याने वादळी खेळीसह यंदाच्या हंगामातील पहिले अर्धशतक झळकावताना वैभव सूर्यवंशीचा विक्रम मोडीत काढला आहे.



पुरनने २१ चेंडूत एक चौकार आणि आठ षटकारांच्या मदतीने ६३ धावांची धमाकेदार खेळी केली. आयपीएल कारकिर्दीत लखनऊ सुपर जाएंट्सकडून हे दुसरे वेगवान अर्धशतक ठरले. लखनऊकडून सर्वात जलद अर्धशतकाचा विक्रम हा निक्कीच्या नावेच आहे. त्याने २०२३च्या हंगामात त्याने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या सामन्यात १५ चेंडूत अर्धशतक साजरे केल्याचा रेकॉर्ड आहे.

मुंबईविरुद्धच्या सामन्यात लखनऊचा संघाकडून सलामीच्या रुपात नवा प्रयोग पाहायला मिळाला. जॉश इंग्लिसला लखनऊकडून पदार्पणाची संधी मिळाली. आठ कोटी ६० लाख रुपयांचा डाव खेळलेल्या या महागड्या खेळाडूने मिचेल मार्शच्या साथीने संघाच्या डावाची सुरुवात केली, पण तो सपशेल अपयशी ठरला. १३ धावा करून त्याने मैदानात सोडल्यावर निकोलस पूरनला तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला पाठवण्यात आले.

या अर्धशतकासह निकोलस पूरन याने वैभव सूर्यवंशीचा खास विक्रम मोडीत काढला आहे. आयपीएलमध्ये पाचव्यांदा पूरनने २०पेक्षा कमी चेंडूत अर्धशतक साजरे करण्याचा पराक्रम नोंदवला आहे. वैभव सूर्यवंशीनं आपल्या अल्प कारकिर्दीत तीन वेळा ही कामगिरी करून दाखवली आहे. या यादीत अभिषेक शर्मा सहा अर्धशतकासह अव्वलस्थानी आहे.

## क्रिकेटपटू अशोक दिंडा पुन्हा बनला आमदार!

**कोलकाता : वृत्तसंस्था**



पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीथ भारतीय संघाचा माजी खेळाडू आणि कोलकाता नाईड रायडर्स संघातील वेगवान गोलंदाज अशोक दिंडा भाजपच्या तिकिटावर पुन्हा एकदा आमदार म्हणून निवडून आला आहे. मोयना मतदारसंघात त्याने १६ हजार २४१ मतांनी विजय मिळवला.

भाजप उमेदवार अशोक दिंडा याला एक लाख २७ हजार १६६ मते मिळाली, तर त्याच्याविरोधात उभे राहिलेले टीएमसी उमेदवार चंदन मंडल यांना एक लाख १० हजार ९२५ मते पडली. क्रिकेटपटू दिंडा याआधीही मोयना मतदारसंघातून आमदार होता. मागील विधानसभा निवडणुकीत त्याने या जागेवर टीएमसीचे संग्राम डोलुई यांना हरवले होते.

राजकारणात पाऊल ठेवण्यापूर्वी अशोक दिंडा हा कोलकाता नाइट रायडर्सचे वेगवान गोलंदाज म्हणून प्रसिद्ध होता. त्याने ९ डिसेंबर २००९ रोजी श्रीलंकेविरोधात खेळताना भारतीय संघातील टी-२०साठी पदार्पण केले होते. पुढे २८ मे २०१० साली त्याने झिम्बाब्वेविरुद्ध एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले.

## रोहित-रिकल्टनने घडवला इतिहास

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर पार पडलेल्या सामन्यात पहिल्या डावात फलंदाजी करताना लखनऊ सुपर जायंट्स संघाने २० षटकांअखेर २२८ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सकडून सलामीला आलेल्या रोहित शर्मा आणि रायन रिकल्टनने दमदार सुरुवात करून दिली. दोघांनी मिळून १००हून अधिक धावा जोडल्या. यासह या जोडीने मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.



मुंबईचा संघ या सामन्यात २२९ धावांच्या मोठ्या आव्हानाचा पाठलाग करण्यासाठी मैदानात आला होता. त्यामुळे मुंबईला चांगल्या सुरुवातीची गरज होती. ही सुरुवात रोहित शर्मा आणि रायन रिकल्टनने करून दिली. रोहित गेले काही सामने दुखापतीमुळे खेळू शकला नव्हता. या सामन्यात पुनरागमन करताच त्याने दमदार अर्धशतकी खेळी केली. रोहितने ८४ धावांची खेळी केली, तर रायन रिकल्टनने ८३ धावा केल्या.

या जोडीने मिळून पहिल्या विकेटसाठी १४३ धावा जोडल्या. यासह या जोडीने मुंबई इंडियन्स संघासाठी असे काही करून दाखवले आहे, जे याआधी कोणालाच जमले नव्हते. रोहित शर्मा आणि रायन रिकल्टनने मुंबई इंडियन्ससाठी तिसऱ्यांदा शतकी भागीदारी केली आहे. असा रेकॉर्ड करणारी ही पहिलीच जोडी ठरली. याआधी रोहित-इशान किशन, सचिन तेंडुलकर-अंबाती रायडू, पार्थिव पटेल-लेंडल सिमन्स या जोडीने प्रत्येकी दोन वेळेस शतकी भागीदारी केली आहे. आता रोहित आणि रिकल्टनच्या जोडीने हा रेकॉर्ड मोडून काढला आहे. यासह तीन वेळा शतकी भागीदारी करणारी पहिलीच जोडी ठरली आहे.

## आरसीबीचा फिल सॉल्ट दुखापतीमुळे मायदेशी

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये जेतेपद राखण्याचे ध्येय उराशी बाळगून मैदानात उतरलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला मोठा धक्का बसला आहे. संघाचा आक्रमक सलामीवीर फिल सॉल्ट दुखापतीमुळे स्पर्धेच्या मध्यंतरातच मायदेशी परतला आहे. सॉल्टची दुखापत ही आरसीबीसाठी चिंतेची बाब ठरली असून हंगामाच्या निर्णायक टप्प्यावर संघाला मॅचविनरची उणीव भासणार आहे.

'ईएसपीएन क्रिकइन्फो'ने दिलेल्या अहवालानुसार फिल सॉल्टच्या डाव्या हाताच्या बोटाला दुखापत झाली आहे. १८ एप्रिल रोजी चिन्नास्वामी स्टेडियमवर दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध खेळताना 'डीप बॅकवर्ड स्क्वेअर लेग'वर झेल टिपण्याच्या प्रयत्नात तो जखमी झाला होता. या दुखापतीनंतर सॉल्ट गेल्या तीन सामन्यांपासून संघाबाहेर होता. इंग्लंड क्रिकेट बोर्डाच्या (ईसीबी) विनंतीवरून त्याला पुढील स्कॅनिंग आणि वैद्यकीय चाचण्यांसाठी युनायटेड किंगडमला धाडण्यात आले आहे. आरसीबी व्यवस्थापनानेही यापूर्वी त्याच्या चाचण्या केल्या होत्या, मात्र तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार त्याला मायदेशी पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला.

## रोहित शर्माचा सुपरहिट शो!

**मुंबई : प्रतिनिधी**

लखनऊ सुपर जायंट्सविरुद्ध मुंबई इंडियन्स संघाकडून रोहित शर्माने सर्वाधिक ८४ धावांची मॅचविनिंग खेळी केली. या खेळीच्या बळावर त्याने आयपीएल स्पर्धेतील सर्वात मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.



१२ एप्रिलला रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघाविरूद्ध झालेल्या सामन्यादरम्यान रोहित शर्मा दुखापतग्रस्त झाला होता. तेव्हापासून तो संघाबाहेर होता. लखनऊ सुपर जायंट्स संघाविरूद्ध झालेल्या सामन्यात त्याला पुनरागमन करण्याची संधी मिळाली. या संधीचा त्याने पुरेपूर फायदा घेतला. यासह संघाचा आत्मविश्वासही उंचावला.

रोहित शर्माने धावांचा पाठलाग करताना २७ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. यासह त्याने ४४ चेंडूंचा सामना करत सहा चौकार आणि सात षटकारांच्या साहाय्याने ८४ धावांची खेळी केली. ही मुंबई इंडियन्सकडून सर्वोत्तम खेळी ठरली. याबरोबरच रोहितच्या नावे खास रेकॉर्डची नोंद झाली आहे. रोहित हा आयपीएल स्पर्धेत आपल्या संघासाठी सर्वाधिक वेळेस सर्वोत्तम खेळी करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तिसऱ्या स्थानी पोहचला आहे.

रोहित शर्माने आतापर्यंत ६० वेळेस आपल्या संघासाठी सर्वात मोठी खेळी केली आहे. या यादीत अव्वल स्थानी असलेल्या विराट कोहलीने सर्वाधिक ६९ वेळेस मोठी खेळी केली आहे, तर दुसऱ्या स्थानी असलेल्या डेव्हिड वॉर्नरने ६६ वेळेस सर्वात मोठी खेळी केली आहे. शिखर धवनने हा कारनामा ५६ वेळेस केला आहे, तर केएल राहुलने ४६ वेळेस आणि ख्रिस गेलने ४४ वेळेस केला आहे.












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com